# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -३०३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ३१ डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


# अखेर वाल्मिक कराड पुण्यात सीआयडी समोर शरण

## पोलीस तपासात जर मी दोषी दिसलो तर न्यायदेवता जी शिक्षा देईल ती भोगायला तयार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१पुणे**

बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात फरार असलेला वाल्मिक कराड हा पुण्यात सीआयडीला शरण आला आहे. यामुळे पुण्यातील उखऊ मुख्यालयाबाहेर पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला होता. तसेच मुख्यालय परिसरात धनंजय मुंडे समर्थकही जमू लागले होते.

मस्साजोग या गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणातील आरोपींच्या शोधासाठी सीआयडीने मोठी कारवाई केली आहे. सीआयडीने सर्व आरोपींची संपत्ती जप्त करण्यास सुरुवात केली आहे. या हत्येच्या प्रकरणात वाल्मिक कराड हे मास्टरमाइंड असल्याचा आरोप होत आहे. अशातच भाजपाचे आमदार सुरेश धस हे मुंडेंवर वेगवेगळे खुलासे करत असून विरोधकांनीही मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केलेली आहे. अशातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुंडे यांच्यात बैठक झाली असून यात कराडच्या शरण येण्यावर निर्णय झाल्याचे समजते आहे.

वाल्मिक कराड आज पुण्यात शरण आला. उखऊची पथके मागील पंधरा दिवसापासून वाल्मिकी कराड यांचा शोध घेत आहेत. परंतू तो त्यांना सापडू शकला नव्हता. वाल्मिक कराडच्या शेवटच्या लोकेशनबाबत मोठी अपडेट समोर आली होती. कराड याचे शेवटचे लोकेशन मध्य प्रदेशातील उज्जैनमध्ये होते, यानंतर त्याचा फोन बंद असल्याचे समोर आले आहे. परंतू, तो त्याच्या आकांसोबत टचमध्ये असल्याचा दावा धस यांनी केला होता. सरेंडर करण्यावरून या दोघांमध्ये वादही झाल्याचे ते म्हणाले होते.




सीआयडीला शरण जाण्यापूर्वी कराडने एक व्हिडीओ जारी केला आहे. यामध्ये त्याने केज पोलीस स्टेशनला खोटी खंडणीची फिर्याद दाखल झाल्याचा आरोप केला आहे. मी सीआयडी ऑफिस पुणे येथे सरेंडर होत आहे. संतोष देशमुख यांचे जे कोणी मारेकरी असतील त्यांना अटक करावी, फाशी द्यावी. राजकीय द्वेषापोटी माझे नाव त्याच्याशी जोडले जात आहे. पोलीस तपासात जर मी दोषी दिसलो तर न्यायदेवता जी शिक्षा देईल ती भोगायला तयार आहे, असे कराड याने स्पष्ट केले आहे.

**पोलिसांनी जंगजंग पछाडलं, कराड कुठं होता?**

वाल्मिक कराडच्या शोधासाठी पोलिसांनी जंगजंग पछाडले होते. पण, नाट्यमयरीत्या आज वाल्मिक कराडने शरणागती पत्करली. एका एसयुव्हीमधून वाल्मिक कराड याने सीआयडी मुख्यालयात हजेरी लावली. त्यावेळी त्याच्यासोबत त्याचे काही कार्यकर्ते होते. वाल्मिक कराड हा मागील काही दिवसांपासून पुण्यातच असल्याची माहिती त्याच्या कार्यकर्त्याने दिली. सोमवारी, वाल्मिक कराड हा अक्कलकोट येथे स्वामी समर्थांच्या मंदिरात गेला असल्याची माहिती या कार्यकर्त्याने दिली.

**तर नागपुरातच सापडला असता वाल्मिक कराड!**

हिवाळी अधिवेशन काळात वाल्मिकी कराड हा नागपुरात आला होता. तो काही साथिदारांसह नागपूर जवळील एका फार्म हाऊसमध्ये पार्ट्या करीत होता, अशी गोपनीय माहिती नागपूर आणि बीड पोलिसांकडे होती. मात्र, अधिवेशनादरम्यान पोलिसांनी वाल्मिक कराड याला सापळा रचून अटक करण्याबाबत गांभीर्य दाखवले नाही. त्यामुळे फार्महाऊसमध्ये काही दिवस मुक्काम ठोकल्यानंतर तेथूनही त्याने पलायन केल्याची माहिती समोर आली आहे.

**कोण आहेत वाल्मिक कराड?**

वाल्मिक कराड हे राज्याचे मंत्री धनंजय मुंडेयांचे निकटवर्तीय मानले जातात. स्वतः पंकजा मुंडे यांनी एका जाहीर सभेत त्यांच्याबद्दल बोलताना म्हटले होते, वाल्मिक कराड यांच्याशिवाय धनंजय मुंडे यांचेही पानही हलत नाही. संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर विरोधकांकडून वाल्मिक कराड यांना लक्ष्य करण्यात आले. भ्रष्टाचारासह बीडमधील कायदा आणि सुव्यवस्थेसंबंधी काही प्रकरणे उपस्थित करून विरोधकांनी वाल्मिक कराड यांच्यावर अनेक आरोप केले आहेत.

## आता न्यायाधीशांचे नातेवाइक उच्च न्यायालयाचे जज होणार नाही...? सुप्रीम कोर्टात प्रस्ताव



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१नवी दिल्ली**

उच्च न्यायालयांमध्ये न्यायाधीशांच्या नातेवाइकांची नियुक्ती करण्याच्या विरोधातील एका प्रस्तावावर सर्वोच्च न्यायालयाचे कॉलेजियम विचार करण्याची शक्यता असल्याचे सूत्रांनी सांगितले. हा प्रस्ताव एका वरिष्ठ न्यायाधीशांनी मांडला असून तो संमत झाल्यास न्यायाधीशांच्या नियुक्त्या गुणवत्तेपेक्षा नातेसंबंधांचा विचार करून केल्या जातात, हा समज दूर होण्यास मदत होईल.

ज्यांचे पालक किंवा जवळचे नातेवाइक हे सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालयाचे आजी किंवा माजी न्यायाधीश आहेत, अशा व्यक्तींच्या नावाची न्यायाधीशपदासाठी शिफारस करणे टाळावे, असा आदेश सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने उच्च न्यायालयाच्या कॉलेजियमना द्यायला हवा, असे या प्रस्तावात म्हटले आहे. मात्र या प्रस्तावामुळे काही पात्र उमेदवारांवर अन्याय होण्याची शक्यताही आहे. मात्र या प्रस्तावामुळे पहिल्या पिढीतील वकिलांची न्यायाधीशपदी नियुक्ती होण्याचा मार्ग अधिक व्यापक होईल, असे मत एका न्यायाधीशांनी व्यक्त केले.

न्यायालयांमध्ये विविध समुदायांतील व्यक्तींचा न्यायाधीश म्हणून समावेश होण्यासाठी हा प्रस्ताव उपयुक्त असल्याचे मतही व्यक्त होत आहे. मात्र विद्यमान किंवा माजी न्यायाधीशांचे नातेवाईक म्हणून पात्र उमेदवारांवर न्यायाधीश बनण्यात हा प्रस्ताव अडथळा ठरू शकतो. त्यामुळे या प्रस्तावाविरोधात सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियममध्ये विरोधी मतही व्यक्त होऊ शकते.

**न्या. यादव संदर्भातील वादाची सावली**

मुंबई, उत्तराखंड, राजस्थान, अलाहाबाद उच्च न्यायालयांमध्ये न्यायाधीशपदासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने २२ डिसेंबर रोजी सहा जणांच्या नावांची शिफारस केली.

अलाहाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश शेखरकुमार यादव यांच्याशी संबंधित वादाच्या पार्श्वभूमीवर न्यायाधीशपदाच्या नियुक्तीसाठी पात्र उमेदवारांशी वैयक्तिक पातळीवर संवाद साधणे आवश्यक वाटत आहे.

यादव यांनी विश्व हिंदू परिषदेच्या कार्यक्रमात वादग्रस्त वक्तव्ये केल्याचा आरोप त्यांच्यावर झाला होता.

## धनंजय मुंडेंची पदावरुन हकालपट्टी करा; मृत संतोष देशमुखांच्या भावाची हायकोर्टात याचिका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१बीड**

बीडच्या मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली असून, राज्यभर निषेध व्यक्त केला जात आहे. या आक्रोशातून गुन्हेगारी आणि राजकारण यांच्यातील एक गुंतागुंतीचा स्पष्ट संबंध समोर येत आहेत. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा मास्टरमाईंड वाल्मिक कराड असल्याचा दावा केला जात असून त्याच्या अटकेसाठी सीआयडीकडून शोध सुरु आहे. दुसरीकडे वाल्मिक कराडचा थेट संबंध मंत्री धनंजय मुंडे यांच्यासोबत असल्याचेही म्हटलं जात आहे. त्यामुळे मंत्री धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळातून दूर करण्याची मागणी करण्यात येत आहे. अशातच धनंजय मुंडेंना मंत्रिपदावरून



काढून टाकण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात याचिका करण्यात आली आहे.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाने बीड जिल्हा हादरला आहे. इंडिया टुडेच्या वृत्तानुसार, या प्रकरणी मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असलेल्या वाल्मिक कराड यांच्या अटकेची मागणी केली जात आहे. मात्र कराडवर खंडणीचा गुन्हा दाखल झाल्यापासून तो फरार आहे. दुसरीकडे आता थेट धनंजय मुंडे यांचे मंत्रिपद काढून घेण्यात यावं यासाठी हायकोर्टात क्रिमिनल रिट याचिका दाखल करण्यात आली आहे. संतोष देशमुख यांचे धाकटे बंधू धनंजय देशमुख यांनी हायकोर्टाकडे ही मागणी केली आहे.

धनंजय देशमुख यांनी तपासात राजकीय हस्तक्षेपाचा आरोप करत मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. याचिकाकर्त्याने राज्यमंत्री आणि राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांच्यावर मुख्य आरोपींपैकी एकाशी संबंध असल्याचा आरोप केला आहे. तसेच धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळातून काढून टाकण्याची आणि वाल्मिक कराडला अटक करण्याची मागणी केली. औरंगाबाद खंडपीठासमोर दाखल केलेल्या याचिकेत संतोष देशमुख यांच्या हत्येला जबाबदार असलेल्या गुन्हेगारी टोळीच्या प्रमुखाशी संबंध असल्याचा आरोप मुंडे यांच्यावर करण्यात आला आहे.

याचिकाकर्त्याच्या म्हणण्यानुसार, मुख्य आरोपी वाल्मिक कराड हा बीडमधील एका शक्तिशाली गुन्हेगारी टोळीचे नेतृत्व करतो ज्याला राजकीय संरक्षण मिळते. कराड यांचे मुंडे आणि राज्यातील इतर प्रभावशाली व्यक्तींशी संबंध असल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. त्यात मुंडे यांची पदावरून हकालपट्टी करण्यात यावी आणि कराड यांच्यावर कठोर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यानुसार कारवाई करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## ईव्हीएमचे रडगाणे थांबवा, आता हवे तसे निकाल येत नाहीत; ओमर अब्दुल्लांचा काँग्रेसला सल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१जम्मू**

हरियाणा आणि महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर काँग्रेस ईव्हीएमविरोधात चांगलीच आक्रमक झाली आहे. ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची मागणी काँग्रेसकडून करण्यात आली आहे. मात्र आता जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी काँग्रेसचा आक्षेप फेटाळून लावला आहे. काँग्रेसने ईव्हीएमवर रडणे थांबवावे आणि आपला पराभव स्वीकारावा, असा सल्ला मुख्यमंत्री अब्दुल्ला यांनी दिला. तुम्ही जिंकता तेव्हा ईव्हीएम ठीक असते, पण जेव्हा तुम्ही हरता तेव्हा तुम्ही ईव्हीएमबद्दल रडायला लागता, असंही ओमर अब्दुलांनी म्हटलं. यावर काँग्रेसनेही जम्मू काश्मीरच्या मुख्यमंत्र्यांना प्रत्युत्तर दिलं आहे.



जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी ईव्हीएम छेडछाडीचे आरोप पूर्णपणे फेटाळून लावत काँग्रेसलाही या मुद्द्यावरुन गोंधळ घालणं थांबवण्याचा सल्ला दिला आहे. मुख्यमंत्री अब्दुल्ला यांच्या वक्तव्यानंतर काँग्रेसमध्ये प्रचंड संताप निर्माण झाला असून त्यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. मुख्यमंत्री झाल्यानंतर आमचे सहकारी असे का वागत आहेत, असा सवाल काँग्रेसने केला आहे.

पराभवासाठी ईव्हीएमला बळीचा बकरा बनवू नये. ईव्हीएममधून शंभरहून अधिक खासदार निवडून आल्यावर तुम्ही त्या विजयाचा आनंद साजरा करता. पण काही महिन्यांनी ईव्हीएम योग्य निकाल देत नाही, असे म्हणता येणार नाही. कारण, आता निवडणुकीचे निकाल हवे तसे येत नाहीत, असं ओमर अब्दुल्ला यांनी एका मुलाखतीमध्ये म्हटलं.

काँग्रेस नेते मणिकम टागोर यांनी ओमर अब्दुल्ला यांना प्रत्युत्तर दिलं आहे. समाजवादी पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) ईव्हीएमविरोधात बोलले आहेत. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला कृपया तुमची तथ्ये तपासा. काँग्रेसने स्पष्टपणे सीडब्ल्यूसी प्रस्ताव केवळ निवडणूक आयोगासमोर मांडला. मुख्यमंत्री झाल्यानंतर आपल्या सहकाऱ्यांबद्दल अशी वृत्ती का?, असा सवाल मणिकम टागोर यांनी केला.

## ...म्हणूनच वाल्मीक कराडला शरणागती पत्करावी लागली


**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१मुंबई**

खंडणीच्या गुन्ह्यातील आरोपी आणि संतोष देशमुख हत्या प्रकरणात सहभाग असल्याचे आरोप होत असलेला वाल्मीक कराड पोलिसांना शरण आला. पुण्यात वाल्मीक सीआयडी कार्यालयात जाऊन वाल्मीक कराडने आत्मसमर्पण केले. त्यानंतर या प्रकरणावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली. गुंडांचं राज्य आम्ही चालू देणार नाही आणि कोणालाही सोडणार नाही, असा इशारा फडणवीसांनी दिला.



मुंबई माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी पहिल्या दिवसापासून सांगतोय की, बीडच्या प्रकरणात कुणालाही आम्ही सोडणार नाही. ज्याचा ज्याचा, ज्या ज्या प्रकरणात संबंध आढळेल; त्या प्रत्येकावर कारवाई करण्यात येईल. अतिशय कडक कारवाई करण्यात येईल. गुंडांचं राज्य आम्ही चालू देणार नाही, असा इशारा मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिला.

## वाल्मिक कराडच्या सरेंडरनंतर सुरेश धसांची मोठी मागणी, 'आका'चा पाय आणखी खोलात जाणार?



**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१मुंबई**

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील संशयित वाल्मिक कराड पुण्यातील सीआयडी कार्यालयात शरण आला आहे.त्यानंतर आता सीआयडीने त्याची चौकशी सुरू केली आहे. तत्पुर्वी या संतोष देशमुख हत्या प्रकरणात विधानसभेत आवाज उठवणारे आणि वाल्मिक कराडवर आका म्हणत अटकेची मागणी करणारे भाजप आमदार सुरेश धस यांनी सरेंडरवर पहिली प्रतिक्रिया दिली आहे. या पहिल्या प्रतिक्रियेत त्यांनी मोठी मागणी केली आहे.त्याच्या या मागणीनंतर वाल्मिक कराडचा पाय आणखी खोलात जाणार आहे. वाल्मिक कराडच्या प्रॉपर्टी या सीझ झाल्याच पाहिजेत. अन्यथा आका जे अन्य गुन्हे करत होते ते उघडे पडणार नाहीत. त्यामुळे प्रॉपर्टी सील झाल्याच पाहिजेत, अशी मोठी मागणी यावेळी सुरेश धसांनी केली आहे. अन्यथा आम्हाला अन्य मार्ग अवलंबवावा लागेल,असे देखील धसांनी सांगितले.

सुरेश धस पुढे म्हणाले की, सुदर्शन घुले हा मुख्य आरोपी आहे आणि प्रतिक घुले, विष्णू चाटे व्हिडिओ कॉल केले होते. त्यात आता शरण आलेले आका १२० ब मध्ये येतील. जर त्यांनी व्हिडिओ कॉल पाहिला असेल ३०२ मध्ये येऊ शकतात.

## समृद्धी महामार्गावर ५० हून अधिक वाहने एकामागोमाग एक पंक्चर; घातपात की..., मदतही मिळेना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१ नागपूर**

मुंबई आणि नागपूरला जोडणाऱ्या समृद्धी महामार्गावर ५० हून अधिक कार व मालवाहू ट्रकचे टायर एकाच भागात पंक्चर होण्याचा खळबळजनक प्रकार घडला आहे. एका लोखंडी पत्र्यामुळे हा प्रकार घडला असून आधीच टायर फुटून अपघातांची मालिका असलेल्या या एक्स्प्रेसवेच्या प्रवासावर प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागले आहे.



समृद्धी महामार्गावर लोखंडाचा पत्रा पडलेला होता. यावरून अनेक वाहने जात होती. हा पत्रा लागून अनेक वाहनांचे टायर फाटले आणि ही घटना घडली. हा प्रकार वाशिम जिल्ह्यातील मालेगाव आणि वनोजा टोल नाका परिसरात घडला आहे. २९ डिसेंबरच्या रात्री १० वाजता यामुळे चारचाकी आणि मालवाहू वाहने ठिकठिकाणी थांबलेली होती. यामुळे हायवेवरही वाहतूक कोंडी झाली होती.

धक्कादायक बाब म्हणजे एक्स्प्रेस हायवे असल्याने आसपास मदतीलाही कोणी नव्हते. भरमसाठ टोल देऊनही कोणी मदतीला येत नव्हते. यामुळे अनेक प्रवासी रात्रभर महामार्गावरच अडकले होते. हा पत्रा अपाघाती पडला की मुद्दामहून फेकण्यात आला याची चौकशी केली जात आहे.

समृद्धीवर सुरुवातीपासून टायर फुटून अनेक भीषण अपघात झालेले आहेत. तसेच लक्झरी बसेसना आगीही लागण्याचे प्रकार घडलेले आहेत. यामुळे आधीच हा महामार्ग जीवघेणा ठरत असताना आता पत्राच रस्त्यावर पडून वाहनांचे टायर पंक्चर झाल्याने व रात्रभर मदतही न मिळाल्याने या महामार्गावरील सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

## संपादकीय ......

# नवीन वर्षात प्रमुख पक्षांसमोर अनेक आव्हाने

नवीन वर्षाची सुरुवात होताच देशातील राजकारण आणि राजकीय पक्षांसमोर आव्हाने उभी आहेत. विशेषत:, भाजप आणि काँग्रेससमोर मोठे आव्हान आहे. भाजपला आपला नवा अध्यक्ष निवडायचा आहे, तर काँग्रेसला पंतप्रधान नरेंद्र मोदींसारख्या निवडणूक जिंकणार्या नेत्याची गरज आहे. अशा नेत्याचा शोध काँग्रेसला घ्यावा लागणार आहे. दिल्ली आणि बिहारमध्ये होणार्या विधानसभा निवडणुकांत भाजपला खडतर परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे.

दिल्लीत काँग्रेसची अवस्था अधिक वाईट आहे. सध्याच्या विधानसभेत पक्षाचा एकही आमदार नाही. याशिवाय यंदाच्या बिहार विधानसभा निवडणुकीतही भाजप आणि काँग्रेसला प्रादेशिक पक्षांचे आव्हान आहे. भाजपसाठी बिहारचा मार्ग सोपा आहे. मात्र, काँग्रेससाठी बिहारची निवडणूक मोठे आव्हान आहे. काँग्रेसच्या मित्रपक्षांनीही पक्षाला बगल देण्यास सुरुवात केली आहे. काँग्रेसकडे स्वत:च्या पायावर उभे राहण्याशिवाय पर्याय उरला नसल्याचे दिसते. हे बहुधा काँग्रेसला कळले असेल. दिल्ली विधानसभेत काँग्रेस पक्ष स्वबळावर लढत आहे. जर दिल्लीत पक्षाला यश मिळाले, तर बिहारमध्ये मित्रपक्षांसोबत चर्चा करायला काँग्रेसला सोपे जाईल. जर दिल्ली विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला यश मिळाले नाही, तर बिहारच नाही तर पुढील वर्षी होणार्या पाच राज्यांच्या निवडणुकाही अवघड जातील.

नवीन वर्षात काँग्रेससमोर पहिले आव्हान असेल ते विरोधकांच्या एकजुटीचे. विरोधकांचे मोठे आव्हान नेतृत्वाचे आहे. विरोधी इंडिया आघाडीतील काँग्रेसचे नेतृत्व मित्रपक्षांना पसंत नाही. मित्रपक्षांनी काँग्रेसविरोधात बंडखोरी सुरू केली आहे. तृणमूल काँग्रेसने सुरुवात केली. हळूहळू आम आदमी पक्ष, राष्ट्रीय जनता दल, समाजवादी पक्ष यासह अनेक प्रादेशिक पक्ष बंडाच्या या भूमिकेत सामील झाले. हे सर्व पक्ष आता काँग्रेसच्या नेतृत्वाखाली काम करायला तयार नाहीत. आगामी लोकसभा निवडणुकीसाठी सध्या पाच वर्षे शिल्लक आहेत; पण इंडिया आघाडीतील पक्षांमध्ये मतभेद तीव्र होत आहेत. या मतभेदामागील हेतू अगदी स्पष्ट आहे. येत्या दोन-तीन वर्षांत १४ राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. यापैकी पुढील वर्षी दिल्ली आणि बिहारमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. दिल्लीत आम आदमी पक्षाची सत्ता आहे. 'आप'ला विधानसभा निवडणुकीसाठी कोणत्याही पक्षासोबत जागांचा ताळमेळ घालायचा नाही. काँग्रेसही दिल्लीत आपला दावा करत आहे. अशा स्थितीत अरविंद केजरीवाल यांनी काँग्रेसला पराभूत करण्यासाठी तृणमूलच्या ममता बॅनर्जी यांच्या भूमिकेशी हातमिळवणी करण्यात कोणतीही कसर सोडली नाही. बिहारमध्येही राष्ट्रीय जनता दलाने हीच पावले उचलली आणि काँग्रेसने 'इंडिया' आघाडीचे नेतृत्व सोडावे, यावर सहमती दर्शवली. 'राजद'ला बिहार विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त जागा लढवायच्या आहेत. काँग्रेसला विरोध करून 'राजद'ने दबाव निर्माण करण्याची रणनीती अवलंबली आहे. त्यामुळे काँग्रेसला विधानसभेत कमी जागा सोडाव्या लागतील. पुढील वर्षी पश्चिम बंगाल, आसाम, पुद्दुचेरी, तामिळनाडू आणि केरळमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. ममता बॅनर्जी यांनी इंडिया आघाडीचे नेतृत्व बदलण्याच्या नावाखाली बंडखोरी केली आणि पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी राजकीय मैदान तयार करण्यास सुरुवात केली. यावरून ममतांनी राज्यात काँग्रेससाठी एकही जागा सोडणार नसल्याचे स्पष्ट केले.

तामिळनाडूमध्ये काँग्रेसला द्रमुकची साथ देणे भाग पडले आहे. राज्यात काँग्रेस जागांसाठी वाटाघाटी करण्याच्या स्थितीत नाही. त्यामुळे तामिळनाडूत बंडाची ठिणगी अजून पेटलेली नाही. आसाममध्ये एकही मजबूत प्रादेशिक पक्ष नाही. त्यामुळे काँग्रेसला तिथं कोणापासून धोका नाही. केरळमध्येही जवळपास अशीच परिस्थिती आहे. उत्तर प्रदेश विधानसभेच्या निवडणुका २०२७ मध्ये होणार आहेत. 'सप' काँग्रेसपासून अंतर ठेवण्यामागे जवळपास असाच हेतू दडलेला आहे. राज्यात काँग्रेस पक्ष मजबूत व्हावा, अशी 'सप'ची इच्छा नाही. 'इंडिया' आघाडीचे नेतृत्व बदलण्यावरून 'सप'ने ममतांना पाठिंबा देऊन काँग्रेसवर दबावाचे राजकारण वाढवले आहे.

मित्रपक्षांव्यतिरिक्त काँग्रेससमोर अनेक आव्हाने आहेत. यामध्ये नेतृत्वाचे संकट हे सर्वात मोठे आव्हान आहे. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे असले, तरी मात्र पक्षाच्या निर्णयांमध्ये राहुल गांधींचा थेट हस्तक्षेप आहे. काँग्रेसमध्ये चार सत्ताकेंद्रे निर्माण झाली आहेत. त्यात सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियांका गांधी आणि मल्लिकार्जुन खर्गे यांचा समावेश आहे. कोणत्या कोर्टात जाऊन हजेरी लावायची, हे काँग्रेस कार्यकर्त्यांना समजत नाही. त्यामुळे काँग्रेसमधील गटबाजी वाढली आहे. खासदार झाल्यानंतर प्रियांका गांधी यांचीही पक्षावरची पकड झपाट्याने वाढू लागली आहे. पक्षांतर्गत ही गटबाजी आगामी काळात आणखी वाढणार आहे. त्याचबरोबर सरकारला कोंडीत पकडण्यासाठी काँग्रेस जे मुद्दे उपस्थित करत आहे, त्याचा निवडणुकीत काहीही फायदा होताना दिसत नाही. त्यामुळे निवडणुकीची कमान सांभाळणार्या राहुल गांधी यांच्या धोरणांवर पक्षांतर्गत प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. त्यांनी त्यांची वैचारिक दिशा आणि धोरण स्पष्ट आणि प्रभावी असल्याची खात्री करावी लागेल. सत्ताधारी पक्ष भाजपबद्दल बोलायचे झाले, तर त्यांच्यासाठीही पुढचा काळ सोपा नाही. भाजपसाठी नरेंद्र मोदींची प्रतिमा ही त्यांची प्रमुख ताकद आहे. परंतु, या प्रतिमेचा प्रभाव कधीकधी नकारात्मक असू शकतो. भविष्यात मोदी सरकारवर कोणतेही मोठे संकट उभे राहिले, तर आपले नेतृत्व सिद्ध करण्याचे आव्हान भाजपसमोर असेल.

# महिला महाविद्यालयात जिल्हास्तरीय भव्य कराओके गीत गायन स्पर्धा व चित्रकला स्पर्धेचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती –** स्थानिक नूतन विदर्भ शिक्षण मंडळ द्वारा संचालित महिला महाविद्यालय जोग चौक अमरावती द्वारा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त शालेय व कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी कराओके गीत गायन स्पर्धा व आंतरशालेय चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे अलीकडच्या स्पर्धात्मक युगात टक्केवारी वाढविण्यासाठी फक्त पुस्तकी ज्ञान आत्मसात करण्यावर विद्यार्थ्यांचा भर असतो. परंतु विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीमध्ये कलांचे स्थान अतिशय महत्त्वाचे असते. या दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांना आपली कला प्रदर्शित करण्यासाठी व्यासपीठ मिळावे, प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने महिला महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी ही संधी उपलब्ध करून देत आहे.चित्रकला स्पर्धा ही वर्ग ८, ९, १० च्या विद्यार्थ्यांकरिता आहे. यामध्ये सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी - १)पर्यावरण २) मुलगी वाचवा ३) देशाप्रति माझे योगदान - या तीन पैकी कुठल्याही एका विषयावर आधारित एक चित्र अर्ध्या ड्रॉइंग शीटवर काढून व रंगवून १ जानेवारी २०२५ पर्यंत महाविद्यालयात जमा करावे. चित्राला विषयाला साजेसे शीर्षक द्यावे.३ जानेवारी २०२५ ला सकाळी नऊ वाजता महाविद्यालयामध्ये जिल्हास्तरीय कराओके गीत गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा दोन गटांमध्ये घेण्यात येणार आहे. अ गट वर्ग ८, ९, १० च्या विद्यार्थ्यांचा आणि ब गट वर्ग अकरावी बारावीच्या विद्यार्थ्यांचा असून यामध्ये हिंदी किंवा मराठी भाषेतील फिल्मी, गैर फिल्मी कोणतेही एक गीत विद्यार्थ्याला सादर करता येईल. दोन्ही स्पर्धांसाठी १००१/-, ७०१/-, ५०१/-, ३०१/- अशी रोख बक्षीसे, सन्मानचिन्ह व सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात येतील. या उपक्रमाला नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या सन्माननीय कार्यकारिणीने शुभेच्छा दिल्या आहेत. दोन्ही स्पर्धांना विद्यार्थ्यांनी भरभरून प्रतिसाद द्यावा असे आवाहन महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश मोहरील यांनी तसेच आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.स्पर्धांबाबत अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी खालील मोबाईल नंबर वर संपर्क करावा.प्रा. मंजिरी वळसे-९४२०२३७०८८प्रा. डॉ. शर्मिला देशमुख-७९७२०८२९८४




# साखर उत्पादनात ८६०३२ पेक्षा सरस असणारी उसाची नवीन जात आली; वाचा सविस्तर

**दि.३१विदर्भ प्रजासत्ताक** – मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्रातून २०२३ मध्ये अखिल भारतीय ऊस समन्वयीत योजनेच्या द्वीपकल्पीय विभागातून महाराष्ट्रासह इतर सहा राज्यांसाठी फुले ऊस १३००७ ही जात प्रसारित करण्यात आली.

या जातीची निर्मिती फुले २६५ आणि कोएम ०२५४ या जातीच्या संकरातून करण्यात आली आहे. फुले ऊस १३००७ ही जात ऊस व साखर उत्पादनात को ८६०३२ या जातीपेक्षा सरस असून सुरू, पूर्व आणि आडसाली या तिन्हीही हंगामासाठी उपयुक्त आहे.

या जातीचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता. याशिवाय क्षारयुक्त जमिनीत या जातीची चांगली उगवण होत असून, उत्पादनक्षमता देखील चांगली आहे. मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्रामध्ये पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता तपासणीचा अभ्यास करण्यात आला.



यामध्ये एप्रिल, मे, जून या काळात देण्यात येणाऱ्या पाण्याच्या पाळ्या थांबविण्यात आल्या होत्या. त्यानंतर नियमित पाणी देऊन निष्कर्ष तपासले असता नियमित पाण्यापेक्षा उत्पादनात केवळ १६ टक्के आणि साखर उत्पादनात १३.९८ टक्के घट आली.भारतीय ऊस संशोधन संस्थेकडून नवीन जातीची शिफारस महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तमिळनाडू, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या राज्यांत लागवडीसाठी करण्यात आली आहे.

वैशिष्ट्ये

कांड्याचा रंग हिरवा, पाचट निघाल्यानंतर रंग पिवळसर हिरवा असतो.

उंच वाढणारी, शंक्वाकृती नागमोडी कांडी.

मध्यम आकाराचा अंडाकृती डोळा, डोळ्यापुढे खाच नाही.

मध्यम रुंदीची सरळ वाढणारी गर्द हिरवी पाने.

पानावर कूस नाही, पाचट सहज निघते.

मध्यम जाडीचा दशी न पडणारा ऊस.

संख्या जास्त, चांगला खोडवा.

लालकुज, काणी, मर, पिवळा पानांच्या रोगास प्रतिकारक्षम.

तांबेरा, तपकिरी ठिपके, पोक्का बोइंग रोगांना प्रतिकारक.

खोड कीड, कांडी कीड व लोकरी मावा किडींना कमी बळी पडणारी जात.

तुरा उशीरा व कमी प्रमाणात येतो.




# टोमॅटो आणि कोलेस्ट्रॉल

**दि.३१विदर्भ प्रजासत्ताक**

हृदयरोगामध्ये कोलेस्ट्रॉल वाढणे किंवा वाढलेले कोलेस्ट्रॉल हे हृदयरोगाचा संकेत देत असते. हृदयविकाराचा धोका कमी करण्यासाठी लायकोपिन हा घटक महत्त्वाचा असतो आणि हा घटक टोमॅटोमध्ये आढळतो. अलीकडेच करण्यात आलेल्या एका संशोधनात हा निष्कर्ष समोर आलेला आहे.



फास्ट फूडच्या अतिरेकाचे परिणाम एव्हाना सर्वत्र दिसू लागले आहेत. त्यामुळेच लोक आपल्या आरोग्याबाबत अलीकडच्या काळात अधिक जागरूक असल्याचे दिसू लागले आहेत. आहारात फास्ट फूडचा समावेश, बैठी जीवनशैली यामुळे हृदयासंबंधीचे आजारही वाढलेले दिसतात. पूर्वी पन्नाशीनंतर होणारे हे आजार आता पंचविशीतच पाहायला मिळू लागले आहेत. हृदयरोगामध्ये कोलेस्ट्रॉल वाढणे हे धोक्याची सूचना मानली जाते किंवा वाढलेले कोलेस्ट्रॉल हे हृदयरोगाचा संकेत देत असते. त्यामुळे हे कोलेस्ट्रॉल नियंत्रणात राखण्यासाठी आपण नैसर्गिक भाज्यांचा वापर करणे अधिक उपयुक्त ठरते. यामध्ये टोमॅटो हे अधिक लाभदायक असल्याचे समोर आले आहे. तसे पाहिले तर लाल रंग हा आपण धोक्याची निशाणी मानत असतो; पण लाल टोमॅटो आपल्याला आजाराच्या धोक्यांपासून दूर ठेवतो. टोमॅटोमध्ये असे अनेक गुण आहेत जे आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहेत. त्यामुळे आपल्या आहारात टोमॅटोचा वापर असणे आवश्यक आहे.

टोमॅटोत मुबलक आढळणारे लायकोपिन हे आतड्याद्वारे शोषले जाते. ते शरीरातील चरबीमध्ये मिसळण्यास सक्षम असते. यामध्ये ऑक्सिकरण रोधक असतात. ते शरीराच्या पेशींना आणि गुणसुत्रांना हानी पोहोचवणार्या फ्री रॅडिकल्सना रोखतात. फ्री रॅडिकल्स हे शरीरातील रक्तप्रवाह अनियमित करून अडचण निर्माण करतात. ते कर्करोगालासुद्धा कारणीभूत ठरू शकतात. रक्तात कोलेस्ट्रॉल वाढले तर रक्तवाहिन्यांच्या आतील स्तरावर जमा होते आणि रक्तप्रवाह अनियमित होतो. त्यामुळे हृदयरोगाचा किंवा हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका वाढतो. हे कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवण्याचे अतिशय महत्त्वाचे काम टोमॅटोमधील घटक करतात.

म्हणूनच टोमॅटो आपल्याला आहारात नियमितपणे समाविष्ट करावेत. यामुळे केवळ हृदयविकारासाठीच लाभ होतो असे नाही, तर टोमॅटोमधील शरीरातील रक्ताचे प्रमाणही वाढते. फ्री रॅडिकल्समुळे सूर्यप्रकाशामुळे होणारा कर्करोग किंवा ओझोनचा स्तर कमी झाल्याने वाढत्या प्रदूषणाचा परिणाम म्हणून फुफ्फुसांचा आजारसुद्धा होऊ शकतो. यापासून बचाव करायचा असेल, हृदयरोगाला दूर ठेवायचे असेल किंवा कोलेस्ट्रॉलपासून स्वतःचा बचाव करायचा असेल तर भरपूर टोमॅटो खावेत. अर्थातच ॲलर्जी आणि प्रकृतीचा विचार करून!

# NCC प्रजासत्ताक दिन शिबिर-२०२५ मध्ये ९१७ मुलींसह २,३६१ कॅडेट सहभागी होणार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१नवी दिल्ली,** NCC प्रजासत्ताक दिन शिबिर-२०२५ ची सुरुवात आज ३० रोजी सर्व धर्म पूजेने करियप्पा परेड ग्राउंड, दिल्ली कँट येथे झाली. डिसेंबर २०२४. ९१७ गर्ल कॅडेट्सच्या सहभागाने, या वर्षीच्या शिबिरात सर्वात जास्त मुली कॅडेट्स असतील. महिनाभर चालणाऱ्या या शिबिरात देशातील सर्व २८ राज्ये आणि ०८ केंद्रशासित प्रदेशातील एकूण २,३६१ कॅडेट्स भाग घेत आहेत.

सहभागामध्ये जम्मू आणि काश्मीर आणि लडाखमधील ११४ कॅडेट्स आणि ईशान्य विभागातील (NER) १७८ कॅडेट्सचा समावेश आहे. मिनी इंडिया चे सूक्ष्म जग सादर करणे. याशिवाय, युवा विनिमय कार्यक्रम (YEP) चा एक भाग म्हणून १४ फ्रेंडली फॉरेन कंट्रीज (FFCs) चे कॅडेट्स आणि अधिकारी देखील शिबिरात सहभागी होणार आहेत.

याप्रसंगी बोलताना, लेफ्टनंट जनरल गुरबीरपाल सिंग, ऊ्रछउउ यांनी कॅडेट्सची छउउ च्या सर्वात प्रतिष्ठित शिबिरासाठी निवड झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून त्यांचे स्वागत केले. धर्म, भाषा, जात या सर्व अडथळ्यांना पार करून चारित्र्य, सचोटी, निस्वार्थ सेवा, कॉम्रेडशिप आणि टीमवर्क हे सर्वोच्च गुण दाखवण्याचा सल्ला त्यांनी कॅडेट्सना दिला.

सहभागी कॅडेट्समध्ये देशभक्ती, शिस्त आणि नेतृत्वगुणांची प्रगल्भ भावना जागृत करणे हे प्रजासत्ताक दिन शिबिराचे मूलभूत उद्दिष्ट आहे. हा वार्षिक कार्यक्रम कॅडेट्सना प्रशिक्षण, सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी आणि सामाजिक सेवा उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी मौल्यवान संधी प्रदान करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करतो, ज्यामुळे एकता आणि अभिमान वाढतो.

# अडगाव येथील अन्न विषबाधा आटोक्यात आरोग्य विभागाची माहिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती–** मोर्शी तालुक्यात अडगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना अन्नातून झालेली विषबाधा आता आटोक्यात असल्याची माहिती जिल्हा आरोग्य विभागातर्फे देण्यात आलेली आहे.

अडगाव येथील शाळेत इयत्ता पहिली ते चौथीच्या पटावर ८० बालके असून शनिवारी (ता.२८) एकूण ७० बालके शाळेमध्ये उपस्थित होती. शाळेमध्ये बालकांना माध्यान्य भोजनामध्ये वाटाणा खिचडी व मोट देण्यात आली. शनिवारी रात्री ८.३० वाजेनंतर काही बालकांना उलटी व पातळ संडास होण्यास सुरुवात झाली. एकुण १८ बालकांना उलटी, संडास हे लक्षणे होती. त्यांच्यावर प्राथमिक आरोग्य केंद्रात त्वरित उपचार सुरु करण्यात आले.

याबाबत माहिती मिळताच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले यांनी जिल्हास्तरीय शीघ्र प्रतिसादपथक तसेच तालुका आरोग्य अधिकारी, मोर्शी यांनातातडीने गावात भेट दिली. डॉ. आसोले जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनामध्ये अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रविण पारिसे, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. जुबेर अली व इतर सदस्य यांनी तातडीने अडगाव येथे परिस्थितीचा आढावा घेऊन उपाययोजना राबविण्यात आल्या. डॉ. प्रविण पारिसे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. जयस्वाल, डॉ. झुबेर अली, वैद्यकिय अधिकारी डॉ. बागडे, समुदाय आरोग्य अधिकारी व आरोग्य कर्मचारी यांनी तात्काळ कार्यवाही करीत परिस्थिती आटोक्यात आणली.अडगाव येथील आयुर्वेदिक दवाखान्यामध्ये एकलन कक्ष उघडण्यात आले. दोन वैद्यकिय अधिकारी, चार समुदाय आरोग्य अधिकारी, चार आरोग्य सेविका व इतर आरोग्य कर्मचारी यांच्या मार्फत आरोग्य सेवा पुरविण्यात येत आहे. एकलन कक्षामध्ये सर्व औषधे, बेड, रुग्णवाहिकेची व्यवस्था करण्यात आलेली असून कक्ष २४ तास कार्यरत आहे.उपचारासाठी एकूण ३१ बालकांना दाखल करण्यात आले असून २३ बालकांना सलाईनमार्फत उपचार करण्यात आले आहे. यापैकी एकुण ११ बालकांना पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय येथे संदर्भित करण्यात आले आहे. सर्व बालकांची प्रकृती स्थिर आहे. शाळेतील इतर बालकाचा आशा स्वंयसेविके मार्फत घरोघरी जाऊन तपासणी पाठपुरावा करण्यात येत आहे. जिल्हास्तरीय शीघ्र प्रतिसाद पथकामार्फत जिल्हा परिषद शाळेमधील तांदुळ, वाटाणा, मोट, कांदा-लसुण मसाला पॅकेट व पाण्याचा नमुना घेण्यात आला आहे.तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाला कळविण्यात आले आहे. आरोग्य विभागाच्या तत्परतेमुळे सर्व बालकांवर तात्काळ उपचार करण्यात आले. त्यामुळे परिस्थिती नियंत्रणात आली.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. ३१ डिसेंबर २०२४ शहर/ग्रामिण


# शेतकरी, मेंढपाळांच्या संरक्षणार्थ बच्चु कडूंचा हुंकार

## शेतमालाचा भाव, पीक कर्ज, मेंढपाळांना न्याय देण्यासाठी ७जानेवारीला 'बाडा आंदोलन'

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१ अमरावती–** विधानसभा निवडणूकांनतर देशाच्या अर्थव्यवस्थेचा व ग्रामीण भागाचा कणा असलेल्या शेतक:यासाठी सत्ताधा:यांनी 'गरज सरो वैद्य मरो' ची भूमिका घेतली असल्याचे दिसत आहे. एकीकडे नविन वर्षात रासायनिक खतांमध्ये वाढ करण्याची भूमिका सरकार घेत आहे, तर दुसरीकडे शेतमालाला जवळजवळ ५० टक्क्यांनी कमी भाव मिळत आहे.




राज्यातील मेंढपाळ आपल्या न्याय मागणीकरिता सरकारचे उंबरठे झिजवित असताना त्यांच्या मागण्यांच्या संबधात मुख्यमंत्री कुठलेही ठोस पाऊल उचलत नाहीत. शेतकरी व मेंढपाळ वाचला पाहीजे याकरिता पुन्हा एकदा बच्चू कडू हुंकार भरत राज्य सरकार विरुध्द जनआंदोलन छेडण्याच्या तयारीत आहेत. सोमवारी पत्रकार परिषदेतून बच्चू कडूंनी याची माहिती देत नविन वर्षात शेतकरी व मेंढपाळांसाठी आंदोलन छेडून सरकारला सडो की, पडो करण्याचा संकल्प घेतला.बच्चु कडूंनी सांगितले की,सोयाबीन, तूर, कापसाला दिवसेंदिवस भाव वाढ मिळायला पाहीजे. मात्र या उलट या पिकांचे भाव कमी होत जाताना पहायला मिळत आहे. सोयाबीन ७ हजाराहून ३५०० रुपयांवर आले, तूर १३ हजार रुपये क्िंटलहून ७ हजार रुपये क्िटलवर आली. कापसाला काही दिवसांपुर्वी १० हजार रुपये प्रती क्विंटल भाव मिळायचा, आज कापसाला ७००० रुपये प्रती क्विंटल भाव मिळत आहे. दुसरीकडे बियाणे, रासायनिक खते, शेणखताचे भाव वाढत जात आहे. अशी परिस्थिती असताना शेतक:यांनी १२ महिने आपल्या कुटूंबाचा उदरनिर्वाह कसा चालवायचा? असा सवालही कडू यांनी यावेळी सरकारला विचारला. या परिस्थितीमूळे शेतक:यांचे जगणे कठीण झाले आहे, आणि त्यामूळेच शेतकरी आत्मघातकी निर्णय घेवू लागला आहे. हा शेतकरी वाचवायचा असेल तर त्याचे संरक्षण होणे महत्वाचे आहे. त्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळाला पाहीजे, वण्यप्राण्यांपासून त्याच्या पिकाचे संरक्षण झाले पाहीजे, त्याला पीक नुकसानीचे पिक विम्याव्दारे भरपाई मिळणे गरजेचे आहे, राज्य सरकारने विधानसभा निवडणूकीच्या काळात घोषीत केलेली सरसकट कर्जमाफी शेतक:यांना तातडीने मिळावी, चराईकरिता परराज्यातून येणा:या मेंढपाळांवर बंदी घालण्यात यावी,

# गडकिल्ले, टेकड्यांवर 'न्यू इयर सेलिब्रेशन' केल्यास होणार कारवाई! वन विभागाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती** नवीन वर्षाचे स्वागत गडकिल्ले, अभयारण्ये किंवा शहरातील टेकड्यांवर जाऊन करायची अनेकांची इच्छा असते. परंतु, वन विभागाकडून तशी परवानगी नाही. त्यामुळे कोणीही अशा ठिकाणी जाऊन नववर्षाचे स्वागत करू नये, अन्यथा त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असा इशारा वन विभागाने दिला.



दरवर्षी नववर्षाच्या पूर्वसंध्येला (३१ डिसेंबर) निसर्गरम्य ठिकाणी जाऊन पर्यटकांची पार्टी करण्याची मानसिकता असते. हे लक्षात घेऊन विभागातर्फे संरक्षित गडकिल्लूयांच्या पायथ्याशी, राखीव वन क्षेत्रात विशेष बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. रात्रभर वन कर्मचारी गस्त घालणार आहेत. तसेच स्थानिक संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्या कार्यकर्त्यांसह वन विभागाचे कर्मचारी ताम्हिणी, मुळशी, सिंहगड,



लोणावळ्यासह राज्यभरातील टेकड्या ,डोंगर, (दि.३१डिसेंबर) रात्री गस्त घालतील. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे.

नागरिकांचे शहराबाहेर, निर्मनुष्य ठिकाणी, जंगलाच्या परिसरात जाऊन पार्टी करण्याचे प्रमाण वाढत आहे. गड-किल्लयांच्या परिसरात, जंगलालगतच्या मोकळ्या माळरानांवर, नदीकिनाऱ्यांवर बेकायदा तंबू टाकून सेलिब्रेशन केले जाते. त्यामुळे वन्यजीवांना त्याचा त्रास होतो.

अनेकजण मद्यप्राशन करतात. बाटल्या तिथेच टाकतात. त्यामुळे वन्यजीवांना इजा होण्याचा धोका असतो. तसेच इतरही अनेक गैरप्रकार उघडकीस आल्याने वन विभागाने ३१ डिसेंबरच्या रात्री गस्त वाढवली आहे. जिल्ह्यातील वन क्षेत्राबरोबर मध्यवर्ती पुण्यातील टेकड्यांवर बंदोबस्त राहणार आहे.

खरंतर राखीव वनक्षेत्रात सूर्यास्तानंतर फिरण्यास बंदी आहे. नियमांची माहिती नसल्याने अनेकदा लोक जंगलांत, मोकळ्या माळरानांवर पार्टी करतात.

दुर्गम भागात तंबू घेऊन जातात. शेकोट्या पेटवतात. त्यामुळे वन्यप्राण्यांच्या वावरावर बंधने येतात. आणि निसर्गाचेही नुकसान केले जाते. त्यामुळे नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला पुण्यातील टेकड्या, वन क्षेत्र आणि सिंहगडावर गस्त वाढविण्यात येणार आहे. सिंहगडावर एरवीप्रमाणेच संध्याकाळी सहा वाजल्यानंतर पर्यटकांना प्रवेश मिळणार नाही. नागरिकांनी याची दक्षता घ्यावी, असे आवाहन वन विभागाने केले आहे.

# विद्याभारती महाविद्यालयाचे सातत्याने चौथ्या वर्षी सुयश

## विद्याभारती महाविद्यालयामधील पाच एनसीसी कॅडेट्सची रिपब्लिक डे परेड साठी निवड

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१ अमरावती** स्थानिक विद्याभारती महाविद्यालयामधील एनसीसी युनिट मधील पाच विद्यार्थ्यांची दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त होणाऱ्या परेड साठी निवड झाली आहे आणि एका विद्यार्थिनीची पहिल्यांदाच पुणे येथे होणाऱ्या आर्मी डे परेडसाठी निवड झाली आहे. महाविद्यालया मधील एनसीसी युनिट हे गर्ल्स आणि बॉईज या दोन तुकडी मध्ये विभागली गेली आहे यावर्षी गर्ल्स यूनीट मधून गणज ऋषीका चंदेल, गणज भूमिका जोशी, गणज वैष्णवी सोनुले आणि बॉईज युनिट मधून गणज भार्गव वानखडे व गणज बादल राठोड या पाच विद्यार्थ्यांची २६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनानिमित्त दिल्ली येथे होणाऱ्या परेडसाठी निवड झाली आहे तर गर्ल्स युनिटमधील डत्रद्ध सानिका कराडे ह्या विद्यार्थिनीची १५ जानेवारीला पुणे येथे होत असलेल्या आर्मी डे परेड साठी निवड झाली आहे.वरील निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मेजर डॉ. मिथिलेश राठोर आणि लेफ्टनंट चेतन जाधव यांची वेळोवेळी खूप मोलाची मार्गदर्शन लाभले. सोबतच कौशल कोंडे ह्या अनुभवी आरडीसी रिटर्न विद्यार्थ्यांची सुद्धा त्यांना मोलाची मदत झाली. एनसीसी युनिट हे दरवर्षी वेगवेगळे उपक्रम आणि वेगवेगळ्या ट्रेनिंग राबवून विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्याचे काम करत असते, सोबतच विद्यार्थ्यांना पोलिस दलामध्ये जाण्यासाठी नेहमीच प्रेरित करत असतात. त्यामुळे यावर्षी महाविद्यालयामधील एनसीसी युनिटचे सातत्याने चौथ्या वर्षी सुद्धा पाच विद्यार्थी दिल्ली येथे होणाऱ्या आरडीसी परेडमध्ये महाराष्ट्राची प्रतिनिधित्व करत आहेत. या प्रतिष्ठेच्या कॅम्प साठी विद्यार्थी सलग पाच ते सहा महिने अत्यंत कठोर मेहनत व शारीरिक ट्रेनिंग करत असतात, त्याचेच फळ म्हणून वरील विद्यार्थ्यांना महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याची संधी यावर्षी मिळालेली आहे. एनसीसी युनिट हे असेच वर्षभर कार्यरत असते आणि विद्यार्थ्यां च्या जडणघडणीची विशेष काळजी घेत असते आणि विद्यार्थ्याला त्यांच्या भावी आयुष्यामध्ये एनसीसी व पोलिस दलामधील वेगवेगळ्या परीक्षे विषयी सखोल माहिती देण्याचे काम करीत असते.सर्वप्रथम विद्यार्थ्यांची निवड ही अमरावती ग्रुपमध्ये होत असते त्यानंतर



JUO ऋषीका चंदेल



JUO भूमिका जोशी




JUO वैष्णवी सोनुले



JUO भार्गव वानखडे



SGT सानिका कराडे



JUO बादल राठोड

अमरावती ग्रुप मधून निवड झालेली विद्यार्थी हे पुणे येथे होणाऱ्या प्री आरडीसी कॅम्प साठी जात असतात. त्यानंतर पुणे येथे नियोजित प्री आरडीसी कॅम्प मध्ये महाराष्ट्रातून आलेल्या सर्व ग्रुपमधून ह्या विद्यार्थ्यांची निवड प्रक्रिया होऊन काही निवडक विद्यार्थी दिल्ली येथे २६ जानेवारीला आरडीसी परेडमध्ये सहभागी होत असतात. ह्या वर्षी पुण्याला झालेल्या ट्रैनिंग कॅम्प मध्ये या युनिटच्या नयन राऊत या विद्यार्थ्यांनी अमरावती ग्रुपचे प्रतिनिधित्व केलेले आहे.या उत्तुंग यशाबद्दल वरील सर्व विद्यार्थ्यांचे व त्यांच्या आई-वडिलांचे सर्वत्र कौतुक होत आहे या यशाबद्दल विद्याभारती शैक्षणिक मंडळाचे अध्यक्ष श्री रावसाहेबजी शेखावत,संस्थेच्या उपाध्यक्ष व एनसीसी गर्ल्स युनीट च्या मेजर डॉ. मिथिलेश राठोर, संस्थेचे सचिव डॉ. अशोकजी चौहान, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. पी. एस. येनकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री एच. के. सिसोदिया, कर्नल हिमांशू, कमांडिंग ऑफिसर, ४ महाराष्ट्र गर्ल्स बटालियन एनसीसी अमरावती , कर्नल विक्रमसिंग भदोरिया, कमांडिंग ऑफिसर ३ महाराष्ट्र सिग्नल कंपनी एनसीसी अमरावती, सुभेदार मेजर सांगलूरा सेलेट, सुभेदार मेजर सुरेश सिंग शेखावत, सुभेदार मेजर राजेंद्र सिंग, सुभेदार मेजर दामोदर साहू आणि कार्यालयीन अधिक्षक श्री राजेश वानखेडे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि प्रजासत्ताक दिनानिमित्त होणाऱ्या परेडसाठी शुभेच्छा दिल्या.विद्यार्थी या यशाची श्रेय मेजर डॉ.मिथिलेश राठोर, लेफ्टनंट चेतन जाधव, प्रा. अमित इंगोले, कौशल कोंडे यांना देत आहे.

# बीड सरपंच हत्याप्रकरणी राज्य सरकारला ७ जानेवारीची मुदत, अन्यथा..; सरपंच परिषदेचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१कोल्हापूर** :-बीड जिल्ह्यातील सरपंच हत्या प्रकरण, धाराशिव जिल्ह्यातील सरपंचाला पेट्रोलने जिवंत जाळण्याचा प्रयत्न यासह राज्यात सतत सरपंचांवर होणारे जीवघेणे हल्ले, अशा घटनांचा महाराष्ट्र राज्य सरपंच परिषदेने निषेध केला असून, ७ जानेवारीपर्यंत आरोपींना अटक करण्यासाठी डेडलाइन दिली आहे. तोपर्यंत राज्य सरकारने जर ठोस निर्णय घेतला नाही, तर राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी राज्यातील सर्व सरपंच आणि उपसरपंच मुंबईत धरणे धरतील, असा निर्णय महाराष्ट्र प्रदेश सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ता काकडे यांनी घेतला आहे.महाराष्ट्र प्रदेश सरपंच परिषदेतर्फे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना यासंदर्भात निवेदन देण्यात आले आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोग या गावच्या माजी सरपंचाचे अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. ही घटना ताजी असतानाच पुन्हा धाराशिव जिल्ह्यातील सरपंचाच्या कारची तोडफोड करून त्यांना पेट्रोलने जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला आहे. या दोन घटनांबरोबरच राज्यात सातत्याने सरपंचांवर होणाऱ्या जीवघेण्या हल्ल्यांमुळे सरपंच परिषद आक्रमक झाली आहे.राज्यात अशा घटना घडणे हे अतिशय चिंताजनक आहे. सरपंचांनी गाव कसा चालवायचा? सरपंच आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची हमी घ्यायची कुणी, असा प्रश्न करीत या घटनांना आळा घालण्यासाठी कठोर पावले उचलण्याची मागणी राज्य सरकारकडे सरपंच परिषदेचे अध्यक्ष जी. एम. पाटील (आजरा) यांनी केली आहे.

# वरूडात भरदिवसा घरफोडी, १.३३ लाखांचा ऐवज लंपास

**विदर्भ प्रजासत्ताक दि.३१वरुड–** बंद घराला लक्ष्य करीत चोरट्यांनी दाराचे कुलूप तोडून सोन्याच्या दागिन्यांसह रोख असा १.३३ लाखांच्या ऐवजावर हात साफ केला.शहरातील व्यंकटेशनगर येथे ही घटना सोमवारी (ता. ३०) घडली. प्राप्त माहितीनुसार, व्यंकटेशनगरातील रहिवासी नवनीत गिरी हे मार्केटीगचे काम करतात तर त्यांची पत्नी शहरातील एका कॉलेजमध्ये लिपीक म्हणून कार्यरत आहे. दोघेही नोकरी करीत असल्याने घराला कुलूप लावून ते कामाला गेले होते. मुलाने आईला कॉलेजमध्ये सोडल्यानंतर तो शेतात गेला होता. ही संधी साधून चोरट्यांनी पाळत ठेवत त्यांच्या घराचे कुलूप तोडून कपाटातील सोन्या-चांदीचे दागिन्यासंह रोख असा एकूण १ लाख ३३ हजार २०० रूपयांचा ऐवज चोरून नेला. याप्रकरणी नवनित महादेव गिरी (वय ५८) यांनी वरूड पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. त्या आधारे पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा व गुन्हा दाखल केला.

# मोर्शी नगर परिषदेची विकास कामे तात्काळ पूर्ण करावीत - खासदार डॉ. अनिल बोंडे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.३१अमरावती,** मोर्शी शहरातील पाणीपुरवठ्याची समस्या तातडीने सोडविण्यात यावी. यासंदर्भात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाने समन्वयाने काम करावे. तसेच मोर्शी नगरपरिषद येथील जिल्हा नियोजन अंतर्गत मंजूर असलेली कामे आणि इतर विकास कामे तात्काळ पूर्ण करावीत ,असे निर्देश खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी आज येथे दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे विविध विषयांचा आढावा खासदार डॉ .बोंडे यांनी घेतला, त्यावेळी ते बोलत होते. जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्र, अपर जिल्हाधिकारी विवेक जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, जिल्हा नियोजन अधिकारी अभिजीत मस्के, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प अधिकारी प्रीती देशमुख, जिल्हा भूमी अभिलेख अधीक्षक महेश शिंदे आदी यावेळी उपस्थित होते.

खासदार डॉ. बोंडे म्हणाले, मोर्शी, वरूड, शे.घाट नगरपरिषद हद्दीतील पीआर कार्ड त्वरित वितरित करण्यात यावे. पीआर कार्ड नसल्यामुळे घरकुलाचा लाभ येथील लाभार्थ्यांना मिळण्यास अडचणी येत आहेत. प्रलंबित पीआर कार्ड प्रकरणांचा निपटारा कडून नागरिकांना कार्ड मिळवून द्यावे.

येथील प्रलंबित पीआर कार्ड प्रकरणांची संख्या तसेच प्रलंबित असल्याची कारणे याबाबत काटेकोर आढावा घेऊन प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करुन




याबाबतचा अहवाल सादर करावा. तसेच दलित वस्ती मधील विकास कामे प्राधान्याने पूर्ण करावी. मोर्शी तालुक्यातील लाडकी, येरला येथील पाण्याची टाकी शिकस्त झाली आहे. ती धोकाग्रस्त असल्यामुळे नवीन बांधण्यासाठी त्वरित कार्यवाही करावी .तसेच नगरपरिषद शेघाट येथील जिल्हा नियोजन अंतर्गत मंजूर असलेल्या रकमेमधून प्रलंबित कामे पूर्ण करण्यात यावी. पर्यटनाचा विकास झाल्यास स्थानिकांना रोजगाराच्या संधी प्राप्त होतात. मौजा नांदुरा येथील 'जय जवान जय किसान निसर्ग पर्यटन केंद्रा'ला चालना देण्याबाबत त्वरित कार्यवाही करण्यात यावी , अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

वरुड नगर परिषद हद्दीतील आठवडी बाजार भरत असलेल्या जागेवर आरक्षण काढून लाभार्थ्यांना पट्टेवापटप करण्यात यावे.

याशिवाय वरूड तालुक्यातील एकालविहीर ते लिंगा रस्त्यासाठी अधिग्रहित केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला त्यांना त्वरित मिळवून देण्यासाठी त्वरित कार्यवाही करावी.

स्केटिंग खेळाचा प्रसार होण्यासाठी मोर्शी शहरातील क्रीडा संकुलाच्या किंवा नगर परिषदेच्या खुल्या जागेवर २० हजार स्क्वेअर फूट जागेवर रोलर स्केटिंग रिंग तयार करण्यासाठी जिल्हा नियोजन अंतर्गत कारवाई करण्यात यावी, असे निर्देश दिले.

खासदार डॉ. बोंडे यांनी जिल्हा परिषद अंतर्गत विविध विषयांचाही आढावा घेतला. यामध्ये प्राथमिक शिक्षकांच्या बदल्या, मनरेगा अंतर्गत विकास कामे, नांदगाव पेठ येथील काशीनाथ बाबा मंदीर देवस्थानासंदर्भात आढावा घेतला .मेळघाट येथील आमनेरी किल्ला स्थळ पर्यटनाच्या दृष्टीने विकसित करण्याबाबत आराखडा तयार करण्यासंदर्भात सूचना दिल्या. शहरे अतिक्रमणमुक्त व्हावी, यासाठी विशेष मोहीम राबवावी, असेही ते यावेळी म्हणाले.-

# गावातील लोकांनी स्टँप पेपर वर लिहून दिले....तरी मला तिथं ६० च मत,

## कोर्ट बदमाश,तरीही कोर्टात जाणार - बच्चू कडू यांचा निर्धार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**
विधानसभा निवडणुकीचे निकाल घोषित होऊन दीड महिना उलटला, तरीही निवडणुकीत पराजित होणाऱ्या उमेदवारांची आकडेमोड मात्र सुरूच आहे. नुकतेच ब्राह्मणवाडा थडी येथील नागरिकांनी माजी आमदार बच्चू कडू यांना आम्ही तुम्हालाच मतदान केले असे लिहून दिले. या गावात बच्चू कडू यांना फक्त ६० मते मिळाली तर १४८ मतदारांनी त्यांना मत दिल्याचे प्रतिज्ञापत्र दिले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा ईव्हीएम वर शंका घेतली जात आहे.

ब्राह्मणवाडा थडी येथील नागरिकांनी बच्चू कडू यांना दिलेल्या त्यांनी सांगितले की ब्राह्मणवाडा थडीअचलपूर मतदारसंघात समाविष्ट आहे या गावातील ७८१ मतदारांपैकी ६५३ मतदारांनी मतदान केले त्यापैकी २७० मते बीजेपीला मिळाली, तर २९३ मते ही काँग्रेसला मिळाली.

बच्चू कडू यांना फक्त साठच मते मिळाली. बच्चू कडू यांना मिळालेली मते बघून गावातील मतदारसुद्धा आश्चर्यचकित झाले. त्यामुळे त्यांनी यासंदर्भात वारंवार प्रशासनाकडे तक्रार केली, मात्र तक्रारीची कुणीही दखल घेतली नाही. परिणामतः



गावातील मतदारांनी नाव, मोबाईल नंबरसह प्रतिज्ञापत्र तयार करून बच्चू कडू यांना सोपविले.

नागरिकांच्या या प्रतिज्ञापत्रामुळे पुन्हा एकदा ईव्हीएम वर शंका घेतली जात आहे. जर बच्चू कडू यांना मतदान केले तर आमची मते गेली कुठे हे प्रशासनाने सांगावे अशी मागणी या गावच्या मतदारांनी केली आहे.' त्यांच्या या मागणीवर आमदार बच्चू कडू यांनी सुद्धा न्यायालयात दाद मागू असे सांगितले.

### मतदारांच्या हाती चिठ्ठी येणे गरजेचे

भारतीय जनता पार्टी विकसित भारत देशामध्ये ईव्हीएमवर मतदान करण्यास इच्छुक आहे, त्यांनी ईव्हीएमवरच मतदान करावे, मात्र ज्या पद्धतीने बॅलेटवर असणारा क्रमांक हा त्या चिठ्ठीमध्ये नमूद असतो त्याचप्रकारे व्हीव्हीपॅट मशीनमध्ये पडणारी चिठ्ठी ही मतदारांच्या हाती आली पाहिजे. जेणेकरून या चिठ्ठीवरील क्रमांक व व्हीव्हीपॅटमध्ये पडणाऱ्या चिठ्ठीचा क्रमांक हा एकसमान असेल त्यावरून मतदारांनासुद्धा आपण योग्य व्यक्तीला मतदान केले असे समजेल आणि चिठ्ठ्यांची मोजणी केली असतासुद्धा ती करता येईल. अशा पद्धतीने ईव्हीएमवर मतदान होईल आणि व्हीव्हीपॅटच्या सहाय्याने बॅलेटनेसुद्धा मतदान केल्याचे समाधान मतदारांना होईल असे माजी आमदार बच्चू कडू म्हणाले.-

# एसटी महामंडळाच्या पाच हजार बसेस भंगारात

## दोन वर्षांत घोषित नवीन बसेस गेल्या कुठे? संघटनेचा सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१नागपूर** - महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) मागील पाच वर्षांमध्ये पाच हजार बसेस भंगारात निघाल्या आहेत. भंगारात निघालेल्या बसेस तुलनेत नवीन बसेस उपलब्ध न झाल्याने प्रवाशांना समस्यांचा सामना करावा लागत आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात (एसटी) २०१८-१९ दरम्यान १६ हजार ४१४ बसेस प्रवासी सेवेत होत्या. ही संख्या २०२२- २३ मध्ये घसरून १३ हजार ३१६ बसेसपर्यंत खाली आली. त्यामुळे बसेसची संख्या कमी होतांना दिसत आहे. तर ३१ मार्च २०२० दरम्यान एसटीच्या १ हजार ५८६ बसेस भंगारात निघाल्या. ३१ मार्च २०२१ मध्ये ९२९ बसेस, ३१ मार्च २०२२ मध्ये ७५२ बसेस, ३१ मार्च २०२३ मध्ये ५७९ बसेस तर ३१ मार्च २०२४ दरम्यान तब्बल १ हजार १२९ बसेस भंगारात निघाल्याची माहिती माहिती सामाजिक कार्यकर्ते अभय कोलारकर यांना माहिती अधिकार कायद्याव्दारे प्राप्त झाली.

दरम्यान जुन्या बसेस भंगारात निघत असताना नवीन बसेस एसटीच्या ताफ्यात फारशा न आल्याने महामंडळातील बसेसची संख्या घसरली आहे. हिवाळी अधिवेशनादरम्यान महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी संचालक मंडळाची नागपुरात बैठक घेतली. यावेळी त्यांनी महामंडळाच्या ताफ्यात नवीन वर्षात ३ हजार ५०० बसेस दाखल होणार असल्याचा व ईव्ही बसेस व भाडेतत्वावरीलही अनेक बसेस मिळणार असल्याचा दावा केला होता. यावर आता महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसने प्रश्न उपस्थित केला आहे. मागील दोन वर्षांत घोषित नवीन बसेस गेल्या कुठे, असा या संघटनेचा प्रश्न आहे.



एसटी महामंडळाच्या ताफ्यातील बसेस कमी झाल्याने त्याचा प्रवासी सेवेवरही परिणाम होत आहे. राज्यातील विविध भागात यात्रा वा इतर मोठे कार्यक्रमानिमित्त पूर्वी मोठ्या प्रमाणात एसटीच्या फेऱ्या वाढवल्या जात होत्या. परंतु बसेसची संख्या कमी झाल्याने आता या फेऱ्या वाढवण्यावर मर्यादा आल्या आहे. त्यामुळे निश्चितच प्रवासी सेवेवरही परिणाम होत असल्याचे एसटी महामंडळातील जाणकारांचे म्हणने आहे.

# लॉटरी बंदीला विरोध विक्रेते रस्त्यावर

## शासनाच्या कल्याणकारी योजनेची थट्टा उडविणारा बंदीचा विचार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१मुंबई** - लाखो विक्रेत्यांचा रोजगार हिसकावून घेणारा महाराष्ट्र राज्य लॉटरी बंदीचा निर्णय असून तो लागु झाल्यास शासनाच्या कल्याणकारी योजनांची थट्टा उडविणारा ठरेल' असे लॉटरी विक्रेत्यांचे जेष्ठ नेते विलास सातार्डेकर यांनी सांगितले. शिवसेना पक्षप्रमुख श्री उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन विक्रेत्यांच्या एका शिष्टमंडळाने मंत्रालयाच्या दिशेने कुच केली त्यावेळी सातार्डेकर बोलत होते.महाराष्ट्र राज्य लॉटरी बंद करण्याचे जे प्रशासकीय षडयंत्र सुरू आहे त्याला जोरदार विरोध करण्याच्या अपेक्षेने शिवसेना पक्षप्रमुख श्री. उद्धव ठाकरे यांच्याकडे मातोश्री निवासस्थानी लॉटरी विक्रेत्यांचे नेते विलास सातार्डेकर यांच्या नेतृत्वाखाली विक्रेत्यांचे शिष्टमंडळ पोहोचले त्याने सरकारच्या कट कारस्थानाचा यावेळी पर्दाफाश केला आहे.महाराष्ट्र राज्य लॉटरी संघटनेने नुकतीच मातोश्री'वर उद्धव ठाकरे आणि विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या अजिंक्यतारा' निवासस्थानी भेट घेऊन महाराष्ट्र राज्य लॉटरी बंदीच्या एकूणच हालचालींची माहिती नेत्यांना दिली. शिवसेना नेते विनायक राऊत यांनी ही लॉटरीच्या सद्यस्थिती बद्दल एक निवेदन स्वीकारले.विरोधकांनीसरकारला जाब विचारून विक्रेत्यांची रोजीरोटी सुरक्षित ठेवावी! अशीही अपेक्षा सातार्डेकर यांनी यावेळी केली.१९९७/९८ या वर्षी राज्य शासनाने अशाच प्रकारे लॉटरीबंदीचा निर्णय तडकाफडकी घेतला होता तेव्हा हे प्रकरण न्यायालयापर्यंत पोहोचलेत्यावेळी हिंदु हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांनी या बंदीला कडकडून विरोध केला होता राज्य शासनाला मिळणार्या महसुलीपेक्षा विक्रेत्यां च्या रोजीरोटीचा प्रश्न हा अधिक महत्त्वाचा आहे.बेकार, अपंग, विधवा, अंध, वयोवृद्ध, अबला यांचा सहभाग विक्रेते म्हणुन असल्याने 'लॉटरी बंदीचा निर्णय घेतल्यास स्वतः रस्त्यावर उतरीन! असाही आक्रमक पवित्रा शिवसेना प्रमुखांनी घेतला होता. त्याची आठवण सातार्डेकर यांनी यावेळी नेत्यांना करून दिली.या संदर्भात अधिक चौकशी करून उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा करून लॉटरी विक्रेत्यांच्या भावना मांडता येतील, असे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सांगितले. लॉटरी विक्रेत्यांच्या शिष्टमंडळातसंघटनेचे सरचिटणीस राजेश बोरकर, उपाध्यक्ष कमलेश विश्वकर्मा, भावेश पवार, अनिल सावंत, उषा कंटागले, दीपाली शर्मा, आशिष गुरव ईत्यादींचा समावेश होता.

# पब संचालकांकडून शक्ती महाराज यांना धमकी

## वेगवेगळ्या नंबरवरून दिला जात आहे दमसीपी, डीसीपीकडे लेखी तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती-** शहरातील विविध हिंदुत्ववादी संघटनांसह शक्तीपीठाचे पिठाधीश शक्ती महाराज यांनी काही महिन्यांपासून शहरात चणएल, स्पा सेंदूर विरोधात एल्गार पुकारून जनआंदोनल सुरू केले होते. अशातच आता पब वाल्यांकडून आपल्याला जिवे मारण्याची धमकी दिली जात असून वेगवेगळ्या नंबरवरून दम दिला जात असल्याची तक्रार शक्ती महाराज यांनी सीपी व डीसीपींकडे केली आहे.शक्ती महाराजसह शहरातील विविध संघटनांनी गेल्या सहा महिन्यांपासून पब व कॅफे विरोधार एल्गार पुकारला असून जनआंदोलन सुरू केले आहे. पब बंद करण्यासाठी आणि मन अंचालकांवर करण्यासाठी अनेकवेळा तीव्र आंदोलन झाले.हिंदुत्ववादी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी ज्याही पबवर धाडी घातल्या तेथे शक्ती महाराज यांनी येऊन पब संचालकांवर कारवाई पोलिस प्रशासनावर दबाव आणला. काही पदाधिकाऱ्यांनी पोलिसांवर पब



संचालकांसोबत साटेलोटे असल्याचा आरोप केला. काही दिवसांपूर्वी कोतवाली पोलिसठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या रिन्ज स्पा सेंटरवर धाड पडल्यानंतर शक्ती महाराज यांनी तेथे येऊन जोरदार विरोध केला होता. शती महाराज यांना पब संचालकांविरोधात अनेकवेळा पत्रकार परिषद सुध्दा घेतल्या. परंतु, ऑरेन्ज स्पावर धाड पडल्यानंतर पबच्या संचालकांडून विविध नंबरवरून आपल्याला जिवे मारण्याच्या धमकी मिळत असल्याचा आरोप शक्ती महाराज यांनी केला असून त्यांनी याबाबत आज ३० डिसेंबर रोजी सीपी, डिसीपींकडे लेखी तक्रार केली आहे.

# शालेय पोषण आहाराचे ऑडिट, तीन वर्षांची तपासणी : माहिती ऑनलाइन भरण्याचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती-** प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत अनुदानाच्या माध्यमातून शाळांकडून विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार दिला जातो. न्यामध्ये अनेकवेळा अनियमितता झाल्याच्या तक्रारी करण्यात येतात. परंतु, ही योजना योग्य पद्धतीने सुरू आहे का, याची पाहणी करण्यासाठी प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या वतीने २०२१ ते २०२४ या काळातील शाळांच्या पोषण आहाराचे ऑडिट करण्याचा निर्णय घेतला आहे.

शिक्षण संचालकांनी दिलेल्या निर्देशानुसार जिल्हास्तरावर योजनेची अंमलबजावणी करताना सन २०२१ ते २०२४ या कालावधीतील खर्चाचे लेखापरीक्षण करण्यासाठी एका संस्थेची नियुक्ती केली आहे. या संस्थेमार्फत राज्यासह जिल्ह्यातीलयोजनेस पात्र सर्व शाळांचे लेखापरीक्षण करण्यात




येणार असल्याने योजनेस पात्र शाळांना एका वेबफॉर्मद्वारे माहिती भरावी लागणार आहे. शाळांनी माहिती भरताना शाळेकडील उपलब्ध सर्व अभिलेखांचा आधार घेऊन योग्य, अचूक व वस्तुनिष्ठ माहिती भरावी. शाळांनी माहिती भरल्यानंतर संस्थेमार्फत टप्प्याटप्प्याने विविध जिल्ह्यांचे लेखापरीक्षण करण्यात येणार आहे.तालुकानिहाय लेखापरीक्षणाचा कार्यक्रम जिल्ह्यांना कळविण्यात येणार आहे. लेखापरीक्षणासाठी शाळांकडून कोणत्याही स्वरूपाची फी घेण्यात येणार नाही. लेखापरीक्षणासाठी सर्व शाळांनी माहिती देणे अनिवार्य आहे. लेखापरीक्षणास माहिती सादर न करणाऱ्या शाळाप्रमुखांकडून दंडात्मक तसेच प्रशासकीय कारवाई करण्यात येणार आहे.

याची होणार तपासणीबैंक पासबुक, कॅशबुकचा तपशील. तांदूळ साठा नोंदवहीं, इतर धान्य माल, तांदूळ खर्च विवरण नोंदवही, शासन खाती भरणा केलेल्या रकमांच्या चलनांची प्रत, खर्चाचे व्हाऊचर्स, उपयोगिता प्रमाणपत्रे, विद्यार्थी आरोग्य तपासणी विवरण आदी बाबींची तपासणी होणार आहे.

# राज्यातून ढगाळ वातावरण निवळले, आता हळूहळू वाढणार थंडी!

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.३१पुणे-** सध्या राज्यामध्ये पावसाचे वातावरण निवळले आहे. त्यामुळे तापमानात चढ-उतार होत आहे. गेल्या आठवडाभरात ढगाळ वातावरण आणि पावसामुळे थंडी एकदम गायब झाली होती. उत्तर भारतातील राज्यांमध्येही बहुतांशी ठिकाणी थंडी जाणवली नाही. पुढील काही दिवसांमध्ये राज्यामध्ये पुन्हा थंडीला सुरुवात होईल, असा अंदाज सेवानिवृत्त हवामानतज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिला.राज्यामध्ये सोमवारपासून (दि.३०) पुढील ३ दिवस म्हणजे गुरुवार दि. २ जानेवारीपर्यंत ऊबदार वातावरण हळूहळू कमी होत जाणार आहे. शुक्रवार (दि.३) पासून त्यापुढील पाच दिवसांसाठी म्हणजे मंगळवार, दि. ७ जानेवारीपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात थंडी



जाणवण्याची शक्यता आहे. त्यातही विशेषतः उत्तर महाराष्ट्र व उत्तर विदर्भातील नंदुरबार, धुळे, जळगाव, नाशिक, नगर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, अकोला, नागपूर, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यांत त्या पाच दिवसांत थंडीचा प्रभाव अधिक राहील. दरम्यानच्या काळात महाराष्ट्रात पावसाची शक्यता नाही, असे खुळे यांनी सांगितले.राजस्थान आणि परिसरावर चक्राकार वाऱ्यांची स्थिती आहे. या परिसरापासून उत्तर गुजरातपर्यंत हवेचा कमीदाबाच्या पट्ट्याचीही निर्मिती झाली. पूर्वेकडील वाऱ्यांच्या प्रभावामुळे आग्नेय अरबी समुद्रापासून दक्षिण महाराष्ट्रापर्यंत हवेचा कमी दाबाचा पट्टा सक्रिय झालेला आहे. यामुळे सध्या उत्तर भारतातील राज्यांमध्ये थंडी कमी झालेली आहे. मागील आठवडाभरात राज्यात ढगाळ हवामानासह पावसानेदेखील हजेरी लावली होती. मागील तीन दिवसांमध्ये राज्याच्या काही भागांत गारपीटही झाली होती, तर पावसानेदेखील पिकांना तडाखा दिला होता. त्यामुळे राज्यातील थंडी गायब झाली. उत्तर भारतातूनही थंडी वाऱ्यांचा प्रवाह काहीसा खंडित झाला होता. राज्यात आजही तापमानात चढ-उतार राहील, असा अंदाज हवामान विभागाने दिला.

# बनावट डांबरप्रकरणी फरार आरोपीला नाशिक मधून अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती** बनावट डांबरप्रकरणी अमरावती शहरासह देशात वेगवेगळ्या ठिकाणी फसवणुकीचे गुन्हे दाखल असलेल्या व गत दहा वर्षांपासून न्यायालयात हजर न झाल्याने न्यायालयाने फरार घोषीत केलेल्या मयुर उर्फ भुऱ्या वसंत सोनवण उर्फ महाजन रा. सावता मंदीर, वरची, आळी, नसिराबाद जि. जळगांव) याला नाशिक येथून पकडून आणले आहे.

मयुर उर्फ भुऱ्या वसंत सोनवणे उर्फ महाजन - याच्याविरुद्ध स्थानिक राजापेठ ठाण्यात तसेच इतर राज्यांमध्ये अनेक गुन्हे




दाखल असल्यामुळे तो जळगांव जिल्हा सोडून नाशिक येथे राहत असल्याची माहिती राजापेठ पोलिसांना प्राप्त झाली होती.२८ डिसेंबरला वारंट पथकातील हवालदार आशिष विघे, विक्रम देशमुख, निलेश पोकळे, सतीष टपके त्याच्या शोधार्थ नाशिक येथे गेले होते.

मयुर उर्फ भुऱ्या वसंत सोनवणे उर्फ महाजन हा अमृतधाम चौक नाशिक येथे रविवारी (ता. २९) पोलिसांना आढळला. त्याला पकडून अमरावतीत आणून अटक करण्यात आली.पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलीस आयुक्त जयदत्त भंवर, पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या मार्गदर्शनात आशिष विधे विक्रम देशमुख, निलेश पोकळे, जगदीश वानखडे, सति टपके यांनी ही कामगिरी केली

# पोलीसांनी फिल्मी स्टाईल पाठलाग करून पकडले गोवंश तस्करांचे वाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

नांदगाव पेठ पोलीस ठाण्याच्याहद्दीत नागपूर मार्गावर आज सोमवारी ३० डिसेंबर च्या सकाळी साडेअकरा वाजता चोर पोलीसांचा खेळ पाहायला मिळाला. गोवंश तस्करी ची माहिती मिळताच पोलिसांनी ट्रकचा पाठलाग केला, हे पाहून चालक तेथून फरार झाला तर टुक मधून उडी मारण्याच्या प्रयत्नामध्ये क्लीनर अहमद खान मोहम्मद खान (मध्य प्रदेश) जखमी झाला. त्याच्यावर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहे.मिळालेल्या माहितीनुसार नागपूर वरून येणाऱ्या ट्रक (एम एच ३१ सीजी ५९६९) मधून गोवंश तस्करी होत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. दरम्यान जसाच हा ट्रक नांदगाव पेठ टोल नाक्यावर दिसला पोलिसांनी त्याचा पाठलाग केला. पोलिसांनी चालकाला वाहन थांबवण्यासाठी म्हटले तर त्याने वाहन न थांबवता उलट तो भरधाव समोर निघाला होता. त्यामुळे पोलिसांनी ट्रकचापाठलाग केला. ट्रक चालकाने टोल नाका तोडून नवसारी कडे तो पळत होता. पोलीस देखील त्याच्या मागेच होते. दरम्यान नवसारी जवळ ट्रकला पोलिसांनी पकडले, मात्र संधी मिळताच ट्रक ड्रायव्हर तिथून पळाला तर क्लीनर अहमद खान वाहनातून उडी मारण्याचा प्रयत्न करत होता. यामध्ये तो जखमी झाला. त्याला जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. जिथे त्याच्यावर उपचार सुरू आहे. त्याच्या डोक्यावर मार लागलेला आहे. पुढील तपास सुरू आहे, फरार आरोपी नागपूर येथील असल्याची प्राथमिक माहिती समोर येत आहे.

# महाराष्ट्र स्टेट एथेलेटिक चँम्पीयनशीपमध्ये सोनाली अहिर ने पटकविले प्रथम क्रमांक


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**



दिनांक २७ डिसेंबर,२०२४ ते दिनांक २९ डिसेंबर,२०२४ रोजी नागपुर येथे झालेल्या ४५वींहमहाराष्ट्र स्टेट एथेलेटिक चँम्पीयनशीप आयोजित करण्यात आले होते. यामध्ये अमरावती महानगरपालिका पशुवैद्यकीय विभागातील कर्मचारी सोनाली अहिर हिने ४५वींह महाराष्ट्र स्टेट एथेलेटिक चँम्पीयनशीपमध्ये सहभाग घेतला होता.महाराष्ट्र स्टेट एथेलेटिक चँम्पीयनशीपमध्ये सोनाली अहिर हिने भालाफेक , थाळीफेक व हॅमर फेक मध्ये प्रथम क्रमांक पटकावून सुवर्ण पदक प्राप्त केले. तिच्या या यशाचे श्रेय अमरावती एथेलेटिक्स असोसिएशन चे अध्यक्ष श्री तडस, श्री नागपुरकर पशुवैद्यकीय विभागाचे पशुशल्य चिकीत्सक डॉ.सचिन बोंन्द्रे, सहाय्यक पशुधन निरीक्षक गुणसागर गवई तसेच तिचे आई, वडील तसेच कुटुंब यांना दिले आहे. या स्पर्धेत अमरावती महानगरपालिकेचे व अमरावती शहराचे नाव रोशन केले आहे. तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

# विद्यापीठातील संस्कृत विभागात गीता जयंती उत्सव व पुस्तक विमोचन कार्यक्रम संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील संस्कृत विभागामध्ये नुकताच गीता जयंती उत्सव साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागाच्या समन्वयक डॉ. संयोगिता देशमुख, प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, वक्ते माजी विभाग अध्यक्ष डॉ. विश्राम बापट, आचार्य अनुराधा शर्मा (संस्कृत शिक्षिका, स्कुल ऑफ स्कॉलर्स, अमरावती), देवयानी कुलकर्णी (क्रीडा अधिकारी तथा बास्केटबॉल प्रशिक्षक, महाराष्ट्र शासन), देवदत्त कुलकर्णी (विदर्भ प्रांत प्रचार प्रमुख, संस्कृत भारती), उल्हास बपोरीकर (अमरावती महानगर संघचालक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ), संस्कृत विभागाचे माजी विद्यार्थी व विश्व हिंदू परिषदेचे प्रांताधिकारी डॉ. सुरेश चिकटे (माजी वैद्यकीय अधिकारी), देवव्रत कुलकर्णी (संचालक, विधीमंत्र छायाचित्र प्रतिष्ठान), डॉ. राजीव मुलमुले उपस्थित होते.


वक्ते डॉ. विश्राम बापट यांनी गायन पध्दतीच्या माध्यमातून कृष्ण, अर्जून यांचा संवाद मानवी जीवनासाठी कसा उपयोगी आहे हे विद्यार्थ्यांना पटवून दिले. आचार्य अनुराधा शर्मा यांनी श्रीमद्भगवद्गीतेचे मर्म आणि विविधांगी साहित्यिक स्वरूप, महत्त्व द्रष्टे स्वरुप, प्रसंगावधानता, कर्तव्यपरायणता, विभूतीयोग, सांख्ययोग, कर्मसंन्यासयोग इत्यादी विषयांवर प्रकाश टाकला. तसेच आहारविहार, संवाद, शंका, समाधान यांसारख्या सामान्य गोष्टी तसेच ज्ञानाच्या अथांग सागराची व्याप्ती गाठणारे गीतेतील प्रत्येक शब्द,सूक्ष्मातीसूक्ष्म व परमश्रेष्ठ विचार सांगणारी श्रीमद्भगवद्गीता आपण नित्य अभ्यासली पाहिजे, आचरणात आणायला पाहिजे असे सांगितले.

प्रमुख अतिथी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी श्रीमद्भगवद्गीता पठनाचा संकल्प तसेच भगवंताने सांगितलेले स्वकर्तव्यपरायणतेचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. अध्यक्षीय भाषणातून डॉ. संयोगिता देशमुख यांनी श्रीमद्भगवद्गीता आणि आपले जीवनकार्य यांचा सहसंबंध प्रस्तूत केला. तसेच विभागाच्या उपलब्धीविषयी व निरंतर प्रगतीविषयक उपस्थितांना माहिती दिली. प्रा. श्वेता बडगुजर, यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी विद्यावारिधि डॉ. राहुल लोधा यांच्या संशोधन पद्धती या पुस्तकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. राहुल लोधा यांनी सदर पुस्तकाचा सारांश आणि उपयोगिता सांगितली.

सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. आद्य परंपरेनुसार ग्रंथपूजनाची सुरुवात करताना भगवद्गीता ग्रंथाचे पूजन करण्यात आले. भार्गव राहुल लोधा, मीरा अमित भेरडे, राघवी चारुदत्त मोहोड या बाल कलाकारांनी सरस्वती वंदना प्रस्तूत केली. त्याबद्दल त्यांना डॉ. राहुल लोधा यांचे संस्कृतगंगा पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले. विभागातील विद्यार्थीनी अमृता कोरडे हिने स्वागतगीत सादर केले. केंद्रिय संस्कृत विश्वविद्यालयाच्या डिप्लोमा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. प्रास्ताविक प्रा. स्वप्ना यावले, सूत्रसंचालन विद्यावारिधि डॉ. राहुल लोधा, तर आभार प्रा. प्रियंका मोहोड यांनी मानले. चि. भार्गव लोधा यानो गायिलेल्या शांतिमंत्राने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाला प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# 'धर्मादाय' संकेतस्थळाच्या संथगतीचा : आता ३१ जानेवारी २०२५ पर्यंत हिशोब पत्रके ऑनलाइन जमा करता येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अकोला**



धर्मादाय आयुक्तालयाच्या संकेतस्थळात गेल्या काही महिन्यांपासून तांत्रिक अडचणी आल्या आहेत. संकेतस्थळ संथगतीने चालत असल्याने त्याचा कामकाजाला मोठा फटका बसला आहे. या अडचणीमुळे हिशोब पत्रके सादर करण्यासाठी आणखी एक महिन्याची मुदतवाढ देण्याचे परिपत्रक धर्मादाय आयुक्त अमोघ कलोती यांनी ३० डिसेंबरला काढले. आता ३१ जानेवारी २०२५ पर्यंत हिशोब पत्रके ऑनलाइन जमा करता येणार आहेत.

सामाजिक संस्था, सार्वजनिक संस्था, संघटना, मंडळे यांचे कामकाज धर्मादाय कार्यालयांतर्गत येते. या सर्व संस्थांची नोंदणी करणे, त्यांचे वर्षाला नूतनीकरण करणे, दरवर्षी लेखापरीक्षण सादर करणे, हिशोब पत्रके सादर करणे ही सर्व कामे धर्मादाय कार्यालयांतर्गत केली जातात. धर्मादाय आयुक्तालयाच्या संकेतस्थळात गेल्या काही महिन्याभरापासून न्यासांची नोंदणी, हिशोब पत्रके जमा करण्याचे कामकाज प्रभावित झाले.

या अडचणीमुळे पक्षकार, वकील व न्यासांच्या नोंदणीसह विविध कामकाजांसाठी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. राज्यातील विविध जिल्ह्यातील धर्मादाय कार्यालयात महिन्याला शेकडो न्यासांची नोंदणी होते. त्यांची हिशोब पत्रके सादर होतात. मात्र, संकेतस्थळाच्या 'सर्व्हर डाऊन' होण्यामुळे कामकाजात अडचणी आल्या आहेत. या तांत्रिक अडचणी गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने येत आहेत. शेवटच्या मुदतीमध्ये हिशोब पत्रके सादर करणाऱ्यांची संख्या वाढत असल्याने ही समस्या येत असल्याचे बोलल्या जाते.

सार्वजनिक संस्थांचे आर्थिक वर्ष ३१ मार्च रोजी संपते. त्यानंतर पुढील सहा महिन्यात त्यांनी हिशोब पत्रके सादर करणे व त्याचे प्रमाणपत्र धर्मादाय कार्यालयाकडून प्राप्त करून घेणे बंधनकारक आहे. मात्र, संकेतस्थळाच्या तांत्रिक अडचणीमुळे हे काम चांगलेच प्रभावित झाले. त्यामुळे धर्मादाय आयुक्तालयाने त्यासाठी संस्थांना ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली होती. ही मुदत संपुष्टात आल्यावर देखील संकेतस्थळाची संथगती कायम असल्याने अद्यापही अनेक स्वयंसेवी संस्थांना आपली हिशोब पत्रके ऑनलाइन जमा करता आलेली नाहीत. त्यामुळे आता धर्मादाय आयुक्तालयाकडून हिशोब पत्रके सादर करण्यासाठी ३१ जानेवारी २०२५ पर्यंतची मुदतवाढ देण्यात आली आहे.

**उंबरठे झिजवण्याची वेळ**

दिवाळीपासून धर्मादाय आयुक्तालय कार्यालयाच्या 'सर्व्हर'मध्ये तांत्रिक अडचण येत आहेत. सार्वजनिक संस्थांच्या वेगवेगळ्या कामासाठी वकील, नागरिक कार्यालयात येतात. अनेक जण बाहेर गावावरून कामासाठी येत असतात. मात्र, तांत्रिक अडचणीमुळे त्यांची निराशा होत असून कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत.

# एका लग्नाची दुसरी गोष्ट! निवृत्तीच्या वयात १४ जोडपी अडकली विवाहबंधनात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१यवतमाळ**



तारुण्यात एक लग्न झाले असताना निवृत्तीनंतर दुसऱ्यांदा विवाहबंधनात अडकणे अनेकांसाठी अडचणीचे ठरू शकते. मात्र यवतमाळ जिल्ह्यात एक, दोन नव्हे तर तब्बल १४ जोडपी निवृत्तीचे आयुष्य जगत असताना लग्नबंधनात अडकली. विशेष म्हणजे, या सर्वांनी आपले मुलं, मुली, सुना, जावई आणि नातवंडांच्या उपस्थितीत सामूहिक विवाह मेळाव्यात आपल्या जोडीदाराच्या गळ्यात हार टाकला. महागावात झालेल्या या सामूहिक मेळाव्यातील लग्नाची गोष्ट सध्या जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरली आहे.

विवाहबंधनात अडकलेली ही सर्व जोडपी आपल्या पहिल्याच जोडीदारासोबत दुसऱ्यांदा चतुर्भूज झाली, हे महत्वाचे. उमरखेड येथील जिल्हा परिषद शाळेतील १९७७ मध्ये दहावी उत्तीर्ण झालेल्या या मित्रांनी हा अनोखा स्नेहमिलन सोहळा २९ डिसेंबर रोजी महागाव येथील मोटरवार मंगल कार्यालयात घेतला. १९७७ मध्ये दहावी झाल्यानंतर सर्व मित्र विखुरले. विविध क्षेत्रात भरारी घेतली. घर, संसार, जबाबदाऱ्या सुरू झाल्या, तशा मित्रांच्या गाठीभेटी कमी झाल्या. पुढे त्या बंदच झाल्या. २०२३ मध्ये काही मित्रांनी पुढाकार घेवून १९७७ च्या बॅचचे कौटुंबिक स्नेहमिलन आयोजित केले. दरवर्षी एका मित्राने पुढाकार घेवून असे 'गेट टू गेदर' आयोजित करण्याचे ठरले. २०२४ मध्ये २९ डिसेंबर रोजी हा स्नेहमिलन सोहळा महागाव येथे घेण्याचे डॉ. संतोष मोटरवार यांनी जाहीर केले. हा स्नेहमिलन सोहळा हटके असावा यासाठी मोटरवार दाम्पत्याचे प्रयत्न सुरू झाले. त्यातूनच सर्व मित्रांचा त्यांच्या सहचारिणीसोबत दुसऱ्यांदा विवाह लावून देण्याची कल्पना सुचली आणि या विवाह सोहळ्याची लगबग महागाव येथे सुरू झाली.

या सोहळ्यात स्वतः विवाह बंधनात अडकणारे असूनही डॉ. संतोष मोटरवार व त्यांच्या पत्नी मीनाक्षी यांनी वधू पक्षाची भूमिका स्वीकारली. रविवार, २९ डिसेंबरला सकाळी सर्व मित्र आपल्या कुटुंबीयांसह कार्यक्रमस्थळी पोहचले तेव्हा सर्व वऱ्हाड्यांचे परंपरेप्रमाणे स्वागत करण्यात आले. दिवसभर विवाहपूर्व विधी पार पडले. सायंकाळी बँड, डिजे लावून सर्वांची मिरवणूक काढून फटाके फोडण्यात आले. गोरज मुहूर्तावर सनई चौघड्याचा सुर उमटू लागला. हॉलमध्ये १०० फुटांचा अंतरपाट धरण्यात आला. या सामूहिक विवाह मेळाव्यात पारंपरिक मंगलाष्टके म्हणत १४ जोडप्यांचा पुनर्विवाह झाला. सर्वांनी पुन्हा एकदा आपल्या जोडीदाराच्या गळ्यात विवाहमाला टाकल्या. तेव्हा वऱ्हाडी म्हणून उपस्थित असलेले या जोडप्यांचे मुलं, मुली, सुना, जावई, नातवंड आपल्या आई - वडिलांचा, सासू - सासऱ्यांचा, आजी - आजोबांचा हा विवाह सोहळा बघून भारावून गेले होते.

या विवाह सोहळ्याला या विद्यार्थ्यांना त्यावेळी शिकवत असलेले व आता वयाच्या नव्वदीत असलेले काही शिक्षकही उपस्थित होते. उपस्थितांनी विवाहानंतर पुनर्विवाहित जोडप्यांना भेटवस्तू देवून स्वागतही केले. लग्नानंतर उपस्थित वऱ्हाड्यांना पंचपक्वानांची पंगतही देण्यात आली. रात्री, 'बाबुल की दुवाये लेती जा' या खास गीताच्या सुरात पुनर्विवाहित दाम्पत्याची घराकडे पाठवणी करण्यात आली.

# वन्य प्राण्यांचा हैदोस, शेतकरी वैतागले : तूर,हरभरा,गहू पिकांचे प्रचंड नुकसान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१नांदगाव खंडेश्वर**

नांदगाव खंडेश्वर तालुक्यात व्यन्य प्राण्यांचा हैदोस वाढला असून पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान करीत असल्याने शेतकरी अखेर या त्रासाला वैतागला आहे. पिकाचे होत असलेले नुकसान टाळण्याकरता शेतकरी आपला जीव मुठीत धरून रात्रीला अंधारात जागरण करीत आहे.

सध्या शेतात रब्बीचे पिक बहरत असताना रोही, रानडुक्कर रात्रीच्या वेळेस पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान करतात. गहू, हरभरा, तूर या पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याने परिसरातील शेतकरी त्रस्त झाला आहे. वन विभागाने या जंगली जनावरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. आधीच शेतकरी निसर्गाच्या लहरीपणामुळे पूर्णपणे हताश झाला.

नांदगाव सोडश्वर तालुक्यात तूर, हरभरा, गहू पिकांचे नुकसान आहे. एकीकडे केंद्र सरकारच्या धोरणामुळे शेतीमालाचे पडलेले भाव आणि दुसरीकडे शेत शिवारात रात्रीच्या वेळी रोही, रानडुक्कर आदी वन्य प्राण्यांकडून उभ्या पिकाची मोठ्या प्रमाणात नासाडी करीत असल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. आधीच खरिपात पावसामुळे झालेले पिकाचे नुकसान तर रब्बीत अवकाळी पाऊस व सतत ढगाळ वातावरणामुळे पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. नैसर्गिक संकटांमधून बचावलेल्या पिकावर वन्यप्राणी ताव मारून नुकसान करीत असल्याने शेतकरी कंटाळला आहे. वन विभागाने जंगली प्राण्याचा बंदोबस्त करावा अन्यथा शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी परिसरात होत आहे.

# अवैध सावकारांचे शतक : ३१ प्रकरणात ४४ सावकारांविरोधात गुन्हे दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

अमरावती जिल्ह्यात सन २०१४ ते २०२४ या १०वर्षात अवैध सावकारीविरोधात सहकार विभागाने शंभर ठिकाणी धाडी टाकल्या आहेत. यामध्ये ३१ प्रकरणात ४४ अवैध सावकारांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आला आहे तर ४६ प्रकरण न्यायप्रविष्ट आहेत. याबाबत सहकार विभागाकडे ३०९ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.जिल्ह्यात अवैध सावकारांकडून अवाढव्य व्याज आकारात नागरिकांची आर्थिक लूट केली जाते. यावर निर्बंध घालण्याची जबाबदारी जिल्हा उपनिबंधक कार्यालयाची असल्याने अवैध सावकारांविरोधात या विभागाकडून धाडी टाकत कारवाई केली जाते. याबाबत सहकार विभागाकडे सन २०१४ ते २०२४ या १० वर्षांत ३०९ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. यामध्ये काही तक्रारीत तथ्य नसल्याने यातील १०० ठिकाणी धाडी टाकण्यात आल्या आहेत. या धाडीत ३१ प्रकरणात ४४ सावकारांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहे. तर ४६ प्रकरणे ही न्यायप्रविष्ट आहे. तर इतर प्रकरणांमध्ये कागदपत्रे सादर केल्याने त्यांची प्रकरणे सुनावणी नंतर निकाली काढण्यात आली आहे. यामध्ये सर्वाधिक गुन्हे अमरावती शहरात १६ अवैध सावकांविरोधात दाखल करण्यात आली असून त्या पाठोपाठ चांदूर रेल्वे तालुक्यात ४ जणांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आली आहे. जानेवारी ते डिसेंबर २०२४ या १२ महिन्यांत जिल्ह्यात ९ धाडी टाकण्यात आल्या आहेत. यामध्ये अमरावतीमध्ये २. अचलपूर ३, धामणगाव रेल्वे १, मोशी १ व नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील दोन अवैध सावकारांच्या घरी धाडी टाकण्यात आल्या आहेत.

**सहकार विभागाची धडाकेबाज कारवाई**




**३ लाख ६४ हजारांच्या रोकडसह १५ प्रकरणांत १८.८० हेक्टर जमीन परत मिळाली**

सहकार विभागाकडे तक्रारी प्राप्त झाल्यानंतर या विभागाकडून संबंधितांची अंतर्गत चौकशी करून धाडी टाकण्यात येतात. अशातच अवैध आढळलेल्या सावकारांकडून अर्जदाराला ३ लाख ६४ हजार ४०० रूपयांची रक्कम परत मिळाली आहे. याशिवाय १५ प्रकरणांमध्ये तडजोडीतून १८.८० हेक्टर आर - जमीनदेखील परत मिळाली आहे.

# सरेंडर झालेला वाल्मिक कराड तीन दिवस पुण्यातच होता


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ३१ पुणे**



आयडीसमोर सरेंडर झालेला वाल्मिक कराड हा पुण्यात किती दिवस होता, याची माहिती एका कार्यकर्त्याने दिली. वाल्मिक कराड हा तीन दिवसांपासून पुण्यात होता, असा दावा त्याच्या कार्यकर्त्यांनी केला आहे. आम्ही अक्कलकोटवरून आलो असल्याचेही त्याने म्हटले. वाल्मिक कराडवर खोटे आरोप करण्यात आले असून, स्वतःहून पुणे सीआयडी कार्यालयात हजर झाले. खोट्या आरोपांमुळे ते घाबरले असतील म्हणून ते बीड पोलिसांसमोर आले नसतील, असेही या कार्यकर्त्याने म्हटले आहे. हा कार्यकर्ता नगरसेवक आहे. वाल्मिक कराडचा शोध घेणाऱ्या पोलिसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

# बँकांपेक्षा खासगी सावकारांकडूनच शेतकऱ्यांना कर्ज, तब्बल ९७.८१ कोटी

## जिल्ह्यात सर्वाधिक २३७ सावकार अमरावती तालुक्यात १४९ अचलपूरचे



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

जिल्ह्यात बँकांपेक्षा खासगी सावकारांनी शेतकऱ्यांना कर्ज दिले आहे. बेकायदेशीर सावकारीला बंदी घालणारा कायदा होऊनही शेतकरी सावकारांच्या तावडीतून सुटत नसल्याचे सहकार विभागाकडून प्राप्त झालेल्या आकडेवारीवरून स्पष्ट होते.

जिल्ह्यातील ६३५ परवानाधारक सावकारांनी ६९ हजार २५१ शेतकऱ्यांना (कर्जदार) ९७.८१ कोटी रुपयांचे कर्ज दिले आहे. आजही अनेक शेतकरी खासगी सावकारांकडून कर्ज घेतात. या कर्जाचा व्याजदर जास्त असतो. पण बँकांमार्फत पीक कर्ज वाटपासाठीचे निकष आणि त्यासाठी होणार विलंब यामुळे शेतकरी गावातील किंवा ओळखीतल्या सावकाराकडून कर्ज घेताना दिसून येतात.

तारण ठेवून कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. जिल्ह्यातील ६८ हजार ८८४ शेतकऱ्यांनी ९५ कोटी २९ लाख ८३ हजार रुपयांचे तारण (गहाण) कर्ज घेतले आहे, तर ३६७ शेतकऱ्यांनी २ कोटी ५१ लाख १९ हजार रुपयांचे बिगर तारण कर्ज घेतले आहे. संबंधित ६९ हजार शेतकऱ्यांनी हे कर्ज २५ एप्रिलपर्यंत संबंधित सावकारांना परत करायचे आहे. जिल्ह्यातील एकाही शेतकऱ्याला एकाही सावकाराने कृषी कर्ज दिले नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. जिल्ह्यात सर्वाधिक २३७ सावकार अमरावती तालुक्यातील असून १४९ अचलपूरचे आहेत.

शेतकऱ्यांना पीककर्ज मिळवण्यासाठी दरवर्षी बँकांच्या अनेक फेऱ्या माराव्या लागतात. त्याचबरोबर सावकारांकडे काही तारण ठेवून त्यांना सहज पैसे मिळतात, परंतु त्यांना बँकेपेक्षा सावकारांना जास्त व्याज द्यावे लागते. तरीही कर्ज सहज उपलब्ध होत असल्याने बहुतांश शेतकरी सावकारांच्या कर्जावर अवलंबून आहेत. जिल्हा उपनिबंधक कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यात एकूण परवानाधारक ६३५ सावकार आहेत. त्यापैकी बहुतेकांनी यंदा परवान्याचे नूतनीकरण केले आहे.

जिल्ह्यात खरीप हंगामाच्या पाठोपाठ रब्बी हंगामातही बँकांनी पीक कर्ज वाटपास टाळाटाळ चालविल्याचे चित्र आहे. रब्बीत ४२० कोटी रुपयांच्या तुलनेत आतापर्यंत केवळ ७३.२७ कोटी रुपयांचे कर्ज वितरण झाले आहे. कर्ज वाटपाचे प्रमाण १७ टक्क्यांवर स्थिर आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक अडचण कायम आहे.याआधी राज्यात मुंबई सावकारी नियंत्रण कायदा-१९४६ अस्तित्वात होता. पण, या कायद्याअंतर्गत सावकारानं बळकावलेली जमीन संबंधित शेतकऱ्याला परत करण्याचे अधिकार जिल्हा उपनिबंधकांना नव्हते. कालांतराने हा कायदा रद्द झाला. त्यानंतर २०१४ मध्ये महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम हा कायदा अस्तित्वात आला. राज्यात सद्यस्थितीत या कायद्याअंतर्गत सावकारी प्रकरणे हाताळली जातात.

# अश्लील चिथावणीखोर भाषणाविरुद्ध आ. प्रवीण तायडे विरोधात गुन्हे दाखल करा

## प्रहार जनशक्ती पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांची ग्रामीण पोलीस अधीक्षकांकडे तक्रार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

अचलपूर तालुक्याचे विद्यमान आमदार प्रवीण वसंतराव तायडे यांनी सोमवार दिनांक ३० डिसेंबर २०२४ रोजी श्रीक्षेत्र बहिरम येथे प्रसारमाध्यमांमध्ये तसेच त्यांच्या सार्वजनिक ठिकाणी केलेल्या भाषणामध्ये आमचे नेते माजी आमदार ओमप्रकाश उर्फ बच्चुभाऊ कडू यांचे विरुद्ध खोटे आरोप प्रत्यारोप करून अश्लील भाषेत शिवीगाळ करून तसेच मारहाण करण्याची धमकी दिलेली आहे. विद्यमान आमदार खोटच्या मार्गाने विजय तर मिळविला परंतु त्याना आता हा खोटा नकाब रुतत असल्याने त्याचेच मुखातून बच्चू कडू व त्यांचे कार्यकर्त्यांचा रोज १०० वेळा नामजप केल्याशिवाय दिवस जात नाही. आपल्या सार्वजनिक भाषणामध्ये एक हश्या पिकविण्याकरीता आणि मी कसा क्रिमिनल माईड मास्टर आहे. याचे प्रदर्शन त्यांचे बोलण्यातून होत आहे. त्यांनी असे नमूद केले की माजी आमदार यांना पराभव पचत नसल्यामुळे ते त्यांच्याविरुद्ध कृत्य करीत आहे.त्यामुळे आमदार प्रवीण तायडे यांनी दिलेल्या धमकी व केलेल्या अश्लील चिथावणीखोर भाषण विरुद्ध गुन्हे दाखल करण्यात यावे अशी मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने शेकडो कार्यकर्त्यांसह ग्रामीण पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या करण्यात आली

आमदार प्रवीण तायडे यांनी भाषणामध्ये असे सुद्धा बेकायदेशीर रित्या नमूद केले की, त्यांनी वेळ सांगावी व किती कार्यकर्ते असेल त्यांना घेऊन यावे असे चिथावणीजनक भाषण व समाजामध्ये व कार्यकत्यांच्या भावना दुखेन यासाठी तसेच दोन परस्पर विरोधी पक्षांमध्ये तेढ निर्माण होईल. या दृष्टिकोनातून केलेले आहे त्यामुळे विनाकारण श्रीक्षेत्र बहिरम येथे आमदार प्रवीण तायडे यांनी लावलेल्या पोस्टरची जी विटंबना झालेली आहे त्या विटंबनाची कोणत्याही प्रहार पक्षाच्या कार्यकत्यांचा अथवा वैयक्तिकरित्या बच्चु कडू यांचा कुठलाही संबंध नसतांना अशा प्रकारचे बेकायदेशीर कथन विद्यमान आमदार प्रवीण तायडे यांच्याकडून करण्यात आलेले आहे. त्यामुळे आम्हा प्रहार पक्षाच्या सर्व कार्यकत्यांच्या भावना दुखावल्या असून वैयक्तिकरित्या माजी आमदार याना विनाकारण प्रवीण तायडे यांनी अश्लील आषेत शिवगाळ केलेली आहे. है विद्यमान आमदाराचे कृत्य बेकायदेशीर असून फौजदारी स्वरूपाचा गुन्हा आहे. तरी सदर विद्यमान आमदारांवर कायदेशीर कारवाई होऊन गुन्हयाची नौद करण्यात अशी मागणी निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली.

# नवीन वर्षात ‘या’ सायबर गुन्ह्यांपासून राहा सावध

## सायबर सेलकडून सल्ला : खबरदारी आहे गरजेची



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

जसजसे डिजिटल युग अधिक प्रगत होत आहे, तसतसे सायबर गुन्ह्यांचे स्वरूप अधिकच गुंतागुंतीचे होत आहे. २०२५ मध्ये या गुन्ह्यांचे स्वरूप बदलत असले तरी नागरिकांनी योग्य सावधगिरी बाळगल्यास या आव्हानांवर मात करता येईल. सुरक्षित डिजिटल अग निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने वागणे गरजे आहे,

**अशी घ्या काळजी...**

मजबूत पासवर्ड आणि २-स्टेप ऑथेंटिकेशन वापरा : सर्व ऑनलाइन खात्यांसाठी मजबूत पासवर्ड ठेवा आणि दुहेरी प्रमाणीकरण प्रणाली वापरा. संशयास्पद लिंक्स, ई-मेल टाळा: अनोळखी व्यक्तींचे ई-मेल, मेसेजमधील लिंक्स उघडू नका. डेटा, उपकरणे नियमितपणे अपडेट करा: स्मार्टफोन, लॅपटॉप आणि आयओटी डिव्हाइसेसचे सॉफ्टवेअर वेळोवेळी अपडेट करा. सार्वजनिक वायफाय वापरताना काळजी घ्या: व्हीपीएनचा वापर करून सुरक्षित ब्राउजिंग सुनिश्चित करा. वित्तीय व्यवहारांसाठी केवळ अधिकृत ॲप्स वापरा : बैंकिंग किया खरेदीसाठी फक्त बैंक किया अधिकृत प्रदात्यांचे ॲप्स वापरा.

**सायबर सुरक्षिततेबाबत जागरूक राहा**

फसवणूक होण्यापूर्वी सायबर गुन्ह्यांच्या तंत्रांचा अभ्यास करा आणि सतर्क राहा. डीप फेक व्हिडीओ, डेटा चोरी रोखण्यासाठी सतर्कता बाळगा.

**कृत्रिम बुद्धिमत्तेचा गैरवापर**

सायबर गुन्हेगार कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) उपयोग करून फिशिंग, स्युफिग आणि डीपफेक व्हिडीओ तयार करतील, ज्यामुळे खोट्या गोष्टी अधिक विश्वासार्ह वाटतील.

**आरोग्याशी संबंधित डेटा चोरी**

स्मार्ट डिव्हाइसेस आणि आरोग्यसेवा ॲप्समधून वैयक्तिक आरोग्य डेटा चोरीला जाईल, ज्याचा उपयोग ब्लॅकमेल करण्यासाठी केला जाऊ शकतो.

**कट्रिप्टोकरन्सीशी संबंधित फसवणूक**

ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा गैरवापर करून बनावट गुंतवणूक योजनांद्वारे फसवणूक वाढेल.

**इंटरनेट ऑफ रिंज (आयओटी) उपकरणांचे हॅकिंग**

स्मार्ट होम आणि कनेक्टेड उपकरणांच्या वापरामुळे त्यांचे हॅकिंग करून गोपनीय माहिती चोरीला जाण्याचा धोका वाढेल.

**पर्सनल आयडेंटीटी डेटा (पीआयडी) चोरी**

डेटा बिचच्या घटनांमुळे वैयक्तिक ओळख चोरीचे प्रकार वाढतील, त्याचा वापर कर्ज, क्रेडिट कार्ड किंवा इतर फसवणुकीसाठी होईल.

# तुषार भारतीय मित्र मंडळच्या वतीने तीन दिवसीय अमृतमंथन व्याख्यानमालाचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

अमरावती- सामाजिक न्यायाचे क्रांतिकारक विचार जनमानसात रुजावे या उद्देशाने तुषार भारतीय मित्र मंडळाच्या वतीने अमृतमंथन हि तीन दिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन ३ ते ५ जानेवारी २०२५ रोजी सायं ६:३० साईरत्न लॉन , साई मंदिराजवळ , साई नगर , अमरावती येथे होणारी व्याख्यानमाला होणार आहे . अमृतमंथन व्याख्यानमाला ही अमरावतीच्या सांस्कृतिक जीवनाचा मानबिंदू मानली जाते. या व्याख्यानमालेत आरोग्य, साहित्य, संस्कृती, अर्थ, राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा व इतर अनेक विषयांवर विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित, मान्यवर, तज्ज्ञ मंडळींची व्याख्याने होत असतात. अमृतमंथन हि प्रबोधन करण्याच्या उद्देशाने मागील बारा वर्ष सुरु असलेली




व्याख्यानमालेला प्रसिद्ध व्याख्याते आशुतोष अडोनी , सिने अभिनेत्री निशिगंधा वाड , सिने अभिनेता राहुल सोलापूरकर , विवेक घळसासी ,सौ डॉ धनश्री लेले , संजीव उपाध्ये , विश्वबंर चौधरी , भाजप प्रवक्ते माधव भंडारी , सौ पूर्णिमा सवाई , अरविंद देशमुख, स्व .सुमंत टेकाडे, राम देशमुख आदींनी हजेरी लावली होती.

दि ३ जानेवारी रोजी अमृत मंथन व्याख्यानमालेचा प्रथम पुष्प प्रसिद्ध व्याख्याते भास्करराव पेरे पाटील ( पाटोदा ) हे आपला परिसर आपले घर तर , दि ४ जानेवारी रोजी अभय भंडारी ( पुणे ) या देवभूमी भारत या विषयावर द्वितीय पुष्प गुंफणार असून व्याख्यानमालेच्या अंतिम पुष्प सिने आशुतोष अडोनी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर या विषयावर व्याख्यान देणार आहे . अमृतमंथन या तीन दिसशीय व्याखानमालेला मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन श्री तुषार भारतीय व मित्र मंडळ यांनी केले आहे.

# आरपीआय जिल्हाध्यक्षाचा शासकीय कार्यालयात आत्महत्येचा प्रयत्न; प्रशासकीय वर्तुळात खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ यवतमाळ**

येथील प्रशासकिय इमारतीत असलेल्या जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या कक्षात एका राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्याने कांत्राटाचे बिल मिळत नसल्याने विष घेवून आत्महत्येचा प्रयत्न केला. अश्वजीत शेळके, असे विष प्राशन करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. त्याच्यावर येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सोमवारी सायंकाळी उशिरा घडलेल्या या प्रकाराने प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

अश्वजीत शेळके हे आरपीआय आठवले गटाचे युवा जिल्हाध्यक्ष आहेत. पुरवठा विभागाने गोदाम हमाल कंत्राटदाराचे दोन महिन्यांचे जवळपास साडेसहा लाख रुपयांचे देयक दिले नसल्याचा आरोप करत तरुणाने हे पाऊल उचलल्याचे सांगण्यात येते. शासकीय धान्य गोदामातील हमालीचा कंत्राट देवानंद शेळके यांच्याकडे आहे. त्यांना नोव्हेंबर २०२३ पासून हे कंत्राट देण्यात आले आहे. मात्र त्यांनी बोगस कागदपत्रे जोडून कंत्राट घेतल्याची तक्रार प्रशासनाकडे आली. त्यात तथ्य आढळल्यानंतर हे कंत्राट रद्द करण्यात आले आहे. देवानंद शेळके यांचे सप्टेंबर ते ऑक्टोबरमधील देयक पुरवठा



अधिकार्यांकडे प्रलंबित आहे. सोमवारी देवानंद शेळके यांनी जिल्हा पुरवठा अधिकारी सुधाकर पवार यांची त्यांच्या दालनात भेट घेतली. पवार यांनी हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने, ही सुनावणी पूर्ण होताच प्रलंबित देयक काढण्यासंदर्भात निर्णय होणार असल्याचे सांगितले. या चर्चेनंतर देवानंद शेळके पुरवठा अधिकाऱ्यांच्या कक्षातून बाहेर गेले. त्यानंतर काही वेळात ते आपल्या दोन मुलांसह पुन्हा कार्यालयात आले. यावेळी काही अभ्यागत कक्षात बसून होते. या ठिकाणी देवानंद शेळके यांनी पुरवठा अधिकाऱ्यांशी देयकावरून वाद घातला. यावेळी उपस्थित असलेल्या त्यांचा मुलगा अश्वजीत शेळके याने देयक न काढल्यास विष प्राशन करून आत्महत्या करण्याची धमकी दिली.

पुरवठा अधिकारी पवार हे त्याला समजावत असतानाच त्याने खिशातून विषाची बाटली काढून विष प्राशन केले. ही बाब लक्षात येताच कक्षात बसून असलेल्या दिगंबर पाटील व पुरवठा अधिकारी सुधाकर पवार यांनी शेळके यांना अडविण्याचा प्रयत्न केला. या झटापटीत बाटलीतील विष पवार यांच्या शर्टवर आणि कक्षातही सांडले. घटनेनंतर शेळके यांना तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले असून उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. पोलिसांनी पुरवठा विभागात धाव घेत तपासणी केली.

या प्रकरणी जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन दिले असून, पोलिसांनाही रीतसर तक्रार दिल्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी सुधाकर पवार यांनी सांगितले.

# ५ ला अमरावतीत जाकीरभाईंना सांगितिक श्रद्धांजली : २४ तबला वादकांचे सांघिक तबला वादन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१ अमरावती**

भारतमातेचे थोर सुपुत्र, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे तबलावादक उस्ताद जाकीर हुसेन यांना अमरावतीकरांकडून श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी २४ तबलवादकांच्या सांघिक तबलावादनाचा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.रविवार ५ जानेवारी २०२४ रोजी सायंकाळी ७ वाजता अमरावतीच्या संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक नाट्यगृहात या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अमरावतीत अनेक नवोदितांवर तबला




वादनाचा संस्कार करणारे, जाकिरभाईंचे अब्बा व गुरू उस्ताद अल्लारखा साहेब यांच्याकडे तबला शिक्षण घेतलेले जाकीरभाईंचे गुरुबंधू गुरुवर्य मुकुंदराव सराफ यांच्या संकल्पनेतून व त्यांच्याच दिग्दर्शनात विदर्भातील ख्यातनाम २४ कलावंत या कार्यक्रमात सांघिक कला सादर करणार आहेत. जाकीर हुसेन यांचा कलावंत म्हणून अमरावतीशी अनेकदा संपर्क आला व अमरावतीकर रसिकांनी जाकीर हुसेन यांच्यावर भरपूर प्रेम केले.या कार्यक्रमात स्वतः मुकुंदराव सराफ यांच्यासह अक्षय ताम्हणकर, स्वरांग केतकर, राधेय इंगळे, वेदांत येते, समीर जगताप, आदित्य उपाध्याय, आदित्य बजाज, मंजिरी जगताप, प्रथमेश मोरे, प्रशांत दुधे, अनामय पवार, सोहम जगताप, राहुल बलखंडे, सिध्देश्वर टिकार, आराध्य गायकवाड, आदित्य पाचघरे, स्वप्निल सरदेशमुख, स्नेहित बंड, प्रसाद महाजन, शौर्य काळे, गजानन पळसकर - हार्मोनियम, श्रीकृष्ण जिरापुरे - हार्मोनियम प्रामुख्याने भाग घेणार आहेत.या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून माजी मंत्री प्रवीण पोटे पाटील, डॉ. उपेंद्र कोठेकर, आ. सौ. सुलभाताई खोडके, आ. राजेश वानखडे, जयंत डेहणकर, प्रा. दिनेश सूर्यवंशी, प्रा. रवींद्र खांडेकर, सौ. किरणताई महल्ले, डॉ. नितीन धांडे, नितीन गुडधे पाटील, चेतन पवार यांच्यासह विविध संस्थांचे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. रसिकांसाठी प्रवेश निःशुल्क आहे.या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपाचे महाराष्ट्र प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांनी केले आहे.

# माजी खासदार नवनित रवि राणा यांची नांदगाव पेठ येथील विदर्भ स्तरीय कबड्डी स्पर्धेला सदिच्छा भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.३१अमरावती**

गेल्या अनेक वर्षांपासून नांदगाव पेठ येथील नेताजी क्रिडा मंडळ यांच्या वतीने भव्य विदर्भस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असते. यावर्षी सुद्धा नेताजी क्रिडा मंडळाच्या मैदानावर भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कबड्डी स्पर्धेला मा.खा.नवनित राणा यांनी सदिच्छा भेट देऊन संपूर्ण विदर्भातून आलेल्या कबड्डी खेळाडूंचे मनोबल वाढवित सांगितले की जिवनामध्ये क्षेत्र



कोणतेही असो त्या क्षेत्राच्या मैदानावर मजबूतीने डटून राहल्या विजय आपलाच असतो असे स्पष्ट केले. त्याचप्रमाणे मा.खा.नवनित राणा यांनी नांदगाव पेठ येथील जे महिला व पुरुष बिझीलँन्ड किंवा चखऊ‌ळ मध्ये दररोज कामाकरिता जातात त्या सर्व कामगारांना जाण्या येण्याकरिता नांदगाव पेठ तसेच बिझीलँन्ड येथे एस.टी चा थांबा देण्यासाठी प्रयत्न करु. त्याचप्रमाणे नांदगाव पेठ येथे नांदगाव पेठ येथील टेल MIDC च्या समोर नेण्याकरिता सुद्धा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले तसेच शेतकऱ्यांना शेतामध्ये जाण्याकरिता सोय व्हावी या करिता चांगल्या गुणवत्तेचे पांधण रस्ते बांधण्याकरिता शासन स्तरावर प्रयत्न करु असे सांगितले.